दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -७७ | शनिवार दि.२२ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-77 | Saturday, Dt.22 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीड नगराध्यक्ष पदासाठी 19 तर 52 नगरसेवक पदासाठी 287 उदमेदवार रिंगणात

## भावी ७ नगराध्यक्ष तर १५२ इच्छुक नगरसेवकांनी ऐनवेळी माघार घेतली ?

बीड /प्रतिनिधी

बीड नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. नगराध्यक्ष पदासाठी २६ इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी सात उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यामुळे आता १९ उमेदवार नगराध्यक्ष पदाच्या लढतीमध्ये राहणार आहेत. बीड नगराध्यक्ष पदासाठी चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे.५२ नगरसेवक पदासाठी १५२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे आता २८७ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात नशीब आजमावणार आहेत. बीडची निवडणूक जातीवर उतरल्यामुळे गुलाबी थंडीत राजकीय वातावरण आता चांगलेच तापणार आहे.

बीड नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. यामुळे बीडचा नगराध्यक्ष होण्याचं स्वप्न या प्रवर्गाशिवाय ज्यांनी ज्यांनी पाहिल होत त्या सर्वांचे मनसूबे धुळीला मिळाले आहेत. आता बीडच्या नगराध्यक्ष पदावर आपले वर्चस्व राहावे याकरिता जातीचे समीकरणे समोर ठेवून उमेदवार दिल्यामुळे बीडचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आता तापलेले हे वातावरण किती खोलवर जाते आणि याचे परिणाम होत असलेल्या नगरपालिका निवडणुकांसह येणाऱ्या आगामी निवडणुकांवर किती परिणामकारक ठरते हे लवकरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे आता बीडच्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष वेधले जाणार आहे.बीडच्या नगराध्यक्ष पदासाठी २६ उमेदवारी अर्ज वैद्य ठरले होते. मागील तीन दिवसांमध्ये केवळ सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता १९ उमेदवार नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नशीब आजमावणार आहेत. उमेदवारांची संख्या १९ झाल्यामुळे दोन मशीन मतदानासाठी ठेवावे लागणार आहेत. याचा परिणाम निश्चितच संभाव्य उमेदवारावर होण्याची शक्यता असल्याने मातब्बर आणि दिग्गज पक्षांच्या उमेदवारांच्या झोपा उडणार आहेत.तर दुसरीकडे ५२ नगरसेवक पदासाठी एकूण ४३९ उमेदवारांचे अर्ज वैद्य ठरले होते. यापैकी १५२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत.

अनेक प्रभागांमध्ये तुल्यबळ लढत होण्याची शक्यता आहे.काही प्रभागात दुरंगी तर काही प्रभागात तिरंगी तर काही प्रभागात चौरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.




### शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पक्ष निष्ठेला न्याय दिला इतरांनी मात्र दुकानदारीच केली ?

बीड नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देताना एकमेव शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेलाच उमेदवारी तर दिलीच. शिवाय मागील अनेक वर्षापासून पक्षाशी आणि विचार व तत्वाशी एकनिष्ठ राहिलेल्या विष्णू भैया वाघमारे यांच्या पत्नीला संधी दिली आहे. इतर सर्वच राष्ट्रीय आणि राज्य पक्षाने उमेदवार देताना एकनिष्ठता न पाहता केवळ दुकानदारीच केली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भारतीय जनता पार्टीने कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला उमेदवार लादला आहे. आम आदमी पार्टीने सुद्धा पक्षातील कार्यकर्त्याला संधी न देता उमेदवार आयात केला आहे.

### दिव्या स्वामी नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत

वीरशैव लिंगायत समाजातील उच्चशिक्षित एम एस सी ॲग्री झालेल्या आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या दिव्या महेश स्वामी या बीड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नशीब आजमावत आहेत.वीरशैव लिंगायत समाजाने या निवडणुकीत आपली सामाजिक ताकद मतपेटीतून व्यक्त करण्याचा निर्धार केला आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या दिव्या स्वामीने उच्च शिक्षणाच्या बळावर धाडस केल्यामुळे या प्रामाणिक आणि स्वच्छ उमेदवाराला संधी देण्याचा निर्धार सर्वच समाजातील मतदारांनी केला असल्याची चर्चा रंगत आहे. त्यामुळे ही निवडणूक कधी आणि कशी वळण घेईल हे सांगणे अवघड जाणार आहे.

### मुस्लिम मतांवर बीडचा नगराध्यक्ष ठरणार ?

बीड नगरपालिकेसाठी एक लाख ८० हजार मतदार आहेत यापैकी निर्णय मतदार हे मुस्लिम समाजाचे आहेत बीड नगरपालिकेवर आपलेच वर्चस्व राहावे याकरिता मुस्लिम समाजाने अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी नगराध्यक्ष पद आरक्षित असताना सुद्धा उमेदवारी देताना शकल लढवली आहे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शेख मुजीब यांच्या सासू प्रेमलता पारवे यांना उमेदवारी दिली आहे तर एम आय एम पक्षाने इनामदार यांच्या पत्नी असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेला उमेदवारी दिली आहे त्यामुळे आता कोणता उमेदवार मुस्लिम मते सर्वाधिक घेतो यावर विजयी उमेदवाराचे भवितव्य अवलंबून ठरणार आहे.

## मुंडे भाऊ – बहिणीचा परळी नगर परिषद निवडणुकीत विजयाचा श्रीगणेशा

### दोन जागा बिनविरोध विजयी!

**धनंजय मुंडेंचे सोशल इंजिनिअरिंग आणि महायुती इफेक्ट ठरणार निर्णायक**

परळी ।प्रतिनिधी

परळी नगर परिषद निवडणुकीत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषद निवडणुकीच्या विजयाचा श्रीगणेशा आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या रेश्मा केशव बळवंत (प्रभाग १३–ब) व शिवसेना (शिंदे गट) च्या उमेदवार जयश्री मुंडे – गित्ते (प्रभाग ११ – अ) या बिनविरोध नगरसेवक झाल्या आहेत. राज्यात अत्यंत चर्चेत असलेल्या परळी वैद्यनाथ नगर परिषद निवडणुकीत मुंडे बंधू – भगिनी महायुती म्हणून एकत्रित लढत असल्याने त्यांचे बळ अधिक असून, निवडणुकीची सुरुवात होण्याआधीच दोन जागा

(उर्वरीत पान २ वर)

## प्रियाराणी पाटील यांच्याकडे प्राथमिक शिक्षण विभागाचा अतिरिक्त कार्यभार



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांना शासनाने निलंबित केल्यामुळे रिक्त झालेल्या शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे.

(उर्वरीत पान २ वर)

## बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात दि. ०४ नोव्हेंबर २०२५ पासून नगरपालिका निवडणूक आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. तसेच विविध राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा–या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०१ डिसेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा–या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा–या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी

(उर्वरीत पान २ वर)

## आक्षेपार्ह रील्स बनविल्यास कठोर कारवाई

बीड ।प्रतिनिधी

आक्षेपाहार्य रील बनविल्यास पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत त्यांनी जाहीर केले. यासंदर्भात जाहीर करण्यात आले आहे की, दादागिरी दाखवणारे, धमक्या देणारे, आक्षेपार्ह पोस्ट टाकनारे , पिस्टल, तलवार घेऊन रील्स बनवणाऱ्यांवर बीड पोलिसांची करडी आणि सतत नजर राहणार आहे. कायद्याशी खेळ करणाऱ्यांना कडक कारवाई केली जाणार आहे. सोशल मीडियाचा वापर खालील बाबीसाठी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.चांगल्या गोष्टींसाठी, समाजजागृतीसाठी,प्रेरणादायी संदेशांसाठीच करावा.लाईक आणि व्ह्यूजपेक्षा कायदा मोठा आहे. त्यामुळे कायद्याचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाहतुक शाखा व नगरपालिकेने १०० पेक्षा जास्त अतिक्रमण धारकांवर केली कारवाई

बीड ।प्रतिनिधी

यापूर्वी शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण केलेल्यांना दणका दिल्यानंतरही व्यापारी व स्टॉलचालक काही सुधारण्याचे नाव घेत नसून पुन्हा–पुन्हा मुख्यरस्त्यावर हातगाडे, ओटे, पत्र्याचे शेड टाकून अतिक्रमण करू लागले.यामुळे दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्यात आली.

सार्वजनिक मुख्य रस्ते हे प्रवासासाठीच असतात.त्या ठिकाणी अतिक्रमण करून रस्ता

(उर्वरीत पान २ वर)



## कारेगव्हाण येथे बप्पासाहेब घुगे यांचा ग्रामसंवाद

### आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार वेगात

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील येळंबघाट पंचायत समिती गणातील कारेगव्हाण येथे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बप्पासाहेब घुगे यांनी ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधला. गावाच्या गरजा, विकासाचे प्राधान्यक्रम आणि स्थानिक प्रश्न यावर सविस्तर चर्चा यावेळी झाली.

घुगे यांनी गावकऱ्यांचे मुद्दे शांतपणे ऐकून घेत ठोस उपाययोजनांची हमी दिली. ग्रामस्थांनीही रस्ते, पाणी पुरवठा, शेतीसंबंधी अडचणी तसेच सामाजिक उपक्रमांची गरज यावर आपली मते मांडली. परस्पर संवादातून निवडणुका पारदर्शक व विकासाभिमुख



व्हाव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. या भेटीद्वारे कारेगव्हाणमध्ये निवडणुकीचे वातावरण रंगतदार झाले असून आगामी दिवसांत या गणातील राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दशमी निमंत्रण पत्रिका
स.न.वि.वि. आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होते की, आमची आई
शिवैक्य. पार्वतीबाई महादेवआप्पा पडोळे
यांची मिती कार्तिक कृष्ण 10 शके 1947 दि. 14/11/2025
रोज शुक्रवार सकाळी 09:15 वा. देवाज्ञा झाली आहे.

दशमी कार्यक्रम
दि. 23/11/2025 रोज रविवार सकाळी 09:00 वाजता.
करण्याचे योजिले आहे. तरी आपण उपस्थित रहावे. हि नम्र विनंती
प्रीतीभोज
सकाळी 10:00 ते 03:00 पर्यंत
स्थळ
राहते घर , बन्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड
आपले विनीत
अशोक महादेव पडोळे
विश्वनाथ महादेव पडोळे
अनिल महादेव पडोळे
सुनिल महादेव पडोळे
व समस्त परिवार पडोळे
मो. 9921893351
नोट : अंत्यविधीस आलेल्या सर्व नातेवाईक व मित्र परिवारास सोबत घेऊन येणे.

## संपादकीय

# ओबीसी आरक्षण पुन्हा अडचणीत ?

राज्यात ओबीसी आरक्षणावरून रखडलेल्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली असतानाच, पुन्हा एकदा हेच ओबीसी आरक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या दारावर येऊन धडका देऊ लागले आहे. याला कारणही पन्नास टक्क्यांच्या वर गेलेले राजकीय आरक्षण हेच ठरले आहे.पाच वर्षांपूर्वी राजकीय आरक्षण पन्नास टक्क्यांच्या वर गेले म्हणून सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील २७ टक्के ओबीसी आरक्षण रद्द केल्याने पाच-सहा जिल्हा परिषदांमध्ये झालेल्या निवडणुकाच रद्द करून ओबीसी आरक्षण वगळून पुन्हा निवडणुका घेण्याची वेळ सरकारवर आली होती. मात्र पुढे ओबीसी आरक्षण पूर्ववत झाल्याशिवाय निवडणुकाच घ्यायच्या नाहीत असा सोयीचा मार्ग सरकारने निवडला. मात्र त्यासाठी फारशी सिद्धता सरकारने न केल्याने राज्यातील सर्वात मोठ्या मुंबई महापालिकेसह सर्वच महापालिकांच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडत गेल्या. तिथे सोयीचे प्रशासक नेमून सरकारने आपला कार्यभार उरकला. राज्यात मात्र लोकप्रतिनिधींशिवाय स्थानिक स्वराज्य अशी परिस्थिती निर्माण झाली. यानंतर तीन सरकारे बदलली आणि विद्यमान सरकार पूर्ण बहुमताने सत्तेवर येताच ओबीसी आरक्षणावर जुनाच आरक्षणाचा उतारा शोधत निवडणुकांचे बिगुल फुंकण्यात आले. मात्र या ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेल्या 'ट्रिपल टेस्ट'ला सामोरे न जाता जुन्याच आरक्षणानुसार सोयीचा मार्ग शोधत सरकारने निवडणुका जाहीर करून आपला कार्यभार पुढे सरकवला खरा, पण हाही आरक्षणाचा आडमार्ग सर्वोच्च न्यायालयात टिकेल की नाही अशी शंका निर्माण झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ४ मार्च २०२१ साली 'विकास किशनराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र सरकार' या खटल्यात आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांच्या पार गेल्याचा हवाला देत अकोला, भंडारा, गोंदिया, वाशिम आणि नागपूर या पाच जिल्ह्यांतील निवडणुका रद्द करत महाराष्ट्र पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अधिनियम १९६१ नुसार राज्यातील इतर मागासवर्गीय समुदायाला दिलेले २७ टक्के आरक्षणच रद्द केले होते. पुढे न्यायालयाने ५ मे २०२५ रोजीच्या निकालात जे. के. बांठिया आयोगाच्या जुलै २०२२ च्या अहवालाच्या आधी राज्यात जी आरक्षण व्यवस्था होती त्यानुसार निवडणूक घेण्यास परवानगी दिली. यानुसार सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीच्या आत रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घ्या, असे आदेश दिल्याने सरकारच्या संमतीने निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात नगरपरिषदा, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद-पंचायत समिती आणि तिसऱ्या टप्प्यात महानगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४७/२०२५**
आसराबाई सर्जेराव महारनोर विरुध्द निरंक
**(मार्फत-ॲड.ए.के.वावरे)**

ज्याअर्थी मयत नामे **सर्जेराव शंकर महारनोर हे दि.३०.०४.२०२४ रोजी पाथरवाला ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.आसराबाई भ्र.सर्जेराव महारनोर, वय-६० वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा.पाथरवाला ता.गेवराई जि.बीड, २.द्रौपदीबाई भ्र.कृष्णा पारखे, वय-४० वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा.महाल किन्होळा, पो.वडोद बाजार, ता.फुलंब्री जि.औरंगाबाद, ३.पार्वती भ्र.गणपत पारखे, वय-३१ वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा.महाल किन्होळा, पो.वडोद बाजार, ता.फुलंब्री जि.औरंगाबाद** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **सर्जेराव शंकर महारनोर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४९/२०२५**
दशरथ नाथा धुमक वि.निरंक
**(मार्फत-ॲड.दानवे अक्षय आर.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **नाथा पि.नरहरी धुमक हे दि.०१.१०.२०२५ रोजी मिरगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.दशरथ पि.नाथा धुमक, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा.मिरगांव ता.गेवराई जि.बीड, २.हनुमंत पि.नाथाजी धुमक वय-५५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३. मथुराबाई पि.नाथाजी धुमक वय-८५ वर्षे, धंदा-काही नाही, रा.सदर, ४.व्दारकाबाई भ्र.रखमाजी मराठे वय-६२ वर्षे, धंदा-शेती, रा.गोविंदवाडी ता.गेवराई जि.बीड, ५. प्रभावती भ्र.श्रीकिशन बोराडे वय-६५ वर्षे, रा.गंगावाडी ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **सर्जेराव शंकर महारनोर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१९/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४८५ दि.२१.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **केशव उत्तम गुंड रा.चंदनापुरी खु.ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुदर्शन केशव गुंड | मुलगा | ०२.०८.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११९० दि.१२.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नारायण भाऊसाहेब वीर रा.भगवान नगर, महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कल्याणी नारायण वीर | मुलगी | २५.०७.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०४१ दि.१९.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ज्ञानेश्वर मच्छिंद्र गाडेकर रा.पिठोरी सिरसगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रवि ज्ञानेश्वर गाडेकर | मुलगा | २१.०७.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९५० दि.१९.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **छबाबाई शामराव जाधव, रा.मठ तांडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नातु**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नागेश गणेश जाधव | नातु | १२.०३.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४२७ दि.२१.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अमृता केशव गुंड रा.चंदनापुरी खु.ता.अंबड** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अमृता केशव गुंड | स्वतः | ०१.०८.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११३० दि.१८.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुनिता प्रल्हाद डोंगरे, रा.कर्जत ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रेया युवराज घोरपडे | नात | ०१.०८.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४८५ दि.२१.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **केशव उत्तम गुंड, रा.चंदरनापुरी खु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुदर्शन केशव गुंड | मुलगा | ०२.०८.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४८५ दि.२१.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कल्पना पन्नालाल गंगवाल, रा.दाढेगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कल्पना पन्नालाल गंगवाल | स्वतः | ०४.०४.१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

पान १ वरुन...

**प्रियाराणी पाटील ....**

बीड जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी श्रीमती प्रियाराणी पाटील यांच्याकडे अतिरिक्त कारभार सोपेविण्यात आल्याचा आदेश निर्गमित केला आहे.श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या बदलीनंतर दिनांक २१ जून २०१५ बीड येथील माध्यमिक शिक्षण विभागाचा कार्यभार स्वीकारला होता. अभ्यासु, कार्यतत्पर, कर्तव्यकठोर आणि समन्वय साधणाऱ्या अधिकारी म्हणून सुपरिचित आहेत. यापूर्वीचे त्यांचे काम उल्लेखनीय राहिले आहे. प्राथमिक शिक्षण विभागास शिस्त लावून सुसूत्रता येईल. गुणवत्ता वाढीसाठीचे सांघिक कार्य त्यांच्याकडून होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**मुंडे भाऊ - बहिणीचा....**

बिनविरोध विजयी झाल्याने मुंडेंचा गड अबाधित राहील, याचे संकेत स्पष्ट झाले आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.दरम्यान या निवडणुकीत पक्षीय गणितांसोबतच उमेदवारी देताना धनंजय मुंडे यांनी साधलेले सोशल इंजिनिअरिंग, त्याला मंत्री पंकजाताई मुंडे यांची साथ, शिवसेनेचे बळ या तीनही गोष्टी एकत्रित आल्याने महायुती इफेक्ट इथे निर्णायक ठरेल असे चित्र निर्माण झाले आहे.राज्यात अनेक ठिकाणी महायुतीची गणिते बिघडल्याचे चित्र आहे, मात्र तरीही धनंजय मुंडे यांच्या पुढाकारामुळे परळी नगर परिषद निवडणुकीत महायुती एकत्र जागा लढवत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस २३ जागांवरती लढत असून, भाजप ८, शिवसेना २ तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांनाही दोन जागा देण्यात आल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी महायुतीची घडी बसवून विजयाचा मार्क अधिक सुकर केला असल्याची चर्चा आहे.

**बीड जिल्ह्यामध्ये ....**

शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

**वाहतुक शाखा व....**

अडवायचा नसतो. मात्र व्यापारी, स्टॉलचालक तसेच हातगाड्यावाले नियमांचे उल्लंघन करुन बीड शहरातील बस स्टॅण्ड, साठे चौक, सुभाष रोड, माळीवेस, आदी मुख्य रोडवरील दुकानदारांनी व स्टॉल चालकांनी रस्त्यावर अतिक्रमण केले. त्यामुळे नगरपालिका आणि जिल्हा वाहतुक शाखेने अतिक्रमण काढून रस्त्यांना मोकळा श्वास करून दिला. त्यामुळे बीड शहरातील रस्ते मोठे वाटू लागले आणि वाहने व नागरिकांना जाण्यासाठी रस्ता सुलभ झाला होता. आज रोजी झालेल्या कारवाईत १०० पेक्षा अधिक अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. यावेळी एपीआय सुभाष सानप , पीएसआय विजय जाधवर, पोलीस हवालदार आदिनाथ मुंडे, पोलीस अंमलदार संजय टुले, चिंतामण शिंदे, राहुल घाडगे, संतोष मोरे, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, नारायण वाघमारे, शेख मॅडम तसेच नगर पालिकेचे अतिक्रमण प्रमुख मुन्ना गायकवाड सोबत सुजित जाधव, विकी दांगट, शरद खुपसे, राम रोकडे, किरण शिंदे, लखन साबळे आदींची उपस्थिती होती. तसेच सपोनि सुभाष सानप यांनी कळविले आहे की, व्यापार्यांनी या पुढे रस्त्यावर अतिक्रमण करु नये व प्रशासनाला सहकार्य करुन कर्तव्याची जबाबदारी घ्यावी अन्यथा अतिक्रमणाची मोहीम थांबणार नाही असा इशारा दिला आहे.

---

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वांसाठी आरोग्य संकल्पनेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रोजेक्ट सुविता अंतर्गत राज्यात ५० लाखांहून अधिक पालकांची नोंदणी पूर्ण

लसीकरणासाठी एसएमएस रिमाइंडर उपक्रमात महाराष्ट्र अग्रणी राज्य

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मातृ आणि बाल आरोग्य सेवांमध्ये डिजिटल माध्यमातून मोठी प्रगती साधली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून सुरू झालेल्याप्रोजेक्ट सुविता अंतर्गत ५० लाखांहून अधिक बालकांच्या पालकांची नोंदणी पूर्ण केली आहे. याशिवाय ४० लाख गर्भवती महिलांचा या उपक्रमात सहभाग नोंदविला गेला आहे. अशा प्रकारे राज्यात एकूण ९४ लाख लाभार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला असून, हा जगातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित व वर्तनशास्त्र-आधारित आरोग्य संप्रेषण कार्यक्रमांपैकी एक ठरला आहे.जुलै २०२१ पासून राज्य शासनाने नॉन-प्रॉफिट संस्था डेव्हलपमेंट कॉन्सोर्टियम प्रोजेक्ट सुविता यांच्या सहकार्याने एसएमएस रिमाइंडर कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत बालकांचे वेळेवर लसीकरण आणि गर्भवती महिलांसाठी मातृ आरोग्य सेवा वाढविण्यासाठी व्यक्तिनिष्ठ आणि वेळेवर पाठविले जाणारे एसएमएस संदेश दिले जातात.प्रत्येक संदेशात लसीचे नाव, त्या लसीने कोणत्या आजारांपासून संरक्षण होते याची माहिती आणि जवळच्या आरोग्य कर्मचाऱ्याशी संपर्क करण्याचे स्पष्ट आवाहन यांचा समावेश असतो.

हा उपक्रम वर्तनशास्त्र संशोधनावर आधारित असून, त्यात लाभार्थ्यांना आरोग्यविषयक निर्णय घेण्यासाठी सक्रिय प्रेरणा दिल्या जातात. जागतिक पातळीवरील संशोधनानुसार (अमेरिका, केनिया, नायजेरिया इ.) एसएमएस रिमाइंडरमुळे लसीकरण न झालेल्या मुलांची टक्केवारी सुमारे १५% नी घटते, असे आढळले आहे. सुविता प्रकल्पाच्या महाराष्ट्रातील सर्वेक्षणातही हेच निष्कर्ष दिसून आले आहेत. एसएमएस संदेशांमुळे पालकांचे आरोग्याविषयीचे ज्ञान वाढले असून ते वेळेवर लसीकरणासाठी आरोग्य केंद्रात येतात.

महाराष्ट्रातील सर्वेक्षणाचे निष्कर्ष

प्रोजेक्ट सुविता यांनी २०२५ मध्ये पालकांवर आणि २०२३ मध्ये आशा कर्मचाऱ्यांवर घेतलेल्या सर्वेक्षणांमध्ये पुढील निष्कर्ष समोर आले आहेत. १,१९२ पालकांपैकी ७०% पालकांना सुविता कडून एसएमएस आल्याचे आठवते. त्यापैकी ४८% पालकांनी संदेशातील विषय (लसीकरण किंवा मातृ आरोग्य) योग्यरीत्या ओळखला. ४०% लाभार्थ्यांनी संदेश अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले, तर ५.६% साठी तो प्राथमिक माहितीचा स्रोत ठरला. ९० आशा कर्मचाऱ्यांपैकी ६१% कर्मचाऱ्यांनी सांगितले की एसएमएस रिमाइंडरमुळे लसीकरणासाठी लाभार्थ्यांना एकत्र करणे अधिक सोपे झाले.

त्यापैकी ३६ आशा ताईंनी नमूद केले की काही पालक फक्त एसएमएस मिळाल्यामुळेच आरोग्य केंद्रात आले, जरी स्थानिक पातळीवरील सूचना दिल्या गेल्या नव्हत्या.

लाभार्थ्यांचा आणि आशा कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद उपक्रमाबाबत अनेक पालक आणि आशा कार्यकर्त्यांनी सकारात्मक अभिप्राय दिला आहे: तुमचा हा प्रोग्राम खूप छान आहे. आम्ही पालकांना रिमाइंड करतोच, पण तुमचे मेसेज आल्यावर पालकांना वाटते की सरकारकडूनही आपल्यावर लक्ष ठेवले आहे. त्यामुळे ते नक्की लसीकरणासाठी येतात.

- आशा आर. सरकळे, गाव: म्हसुरळे, तालुका खटाव, जि. सातारा

सुविता प्रोग्रॅममुळे पालक जागरूक झाले आहेत. आधी सांगूनही काहीजण येत नसत, पण एसएमएस आल्यावर ते स्वतः चौकशी करतात.

- आर. अत्तर, गाव: सुवाडी, तालुका फलटण, जि. सातारा

आम्ही शेतात असतो म्हणून आशा ताई घरापर्यंत येऊ शकत नाहीत. पण तुमच्या एसएमएसमुळे आम्हाला वेळेवर लसीकरणाची आठवण होते.

- शीला, गाव: जानेफळ, तालुका जाफराबाद, जि. जालना

राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिनंदन केले आहे. तसेच या कार्यक्रमाच्या यशामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या अधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. प्रोजेक्ट सुविता टीमचेही कौतुक करण्यात आले असून, शासनाने भविष्यातही या भागीदारीतून राज्यातील लसीकरण कव्हरेज ९५% पेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

प्रोजेक्ट सुविता हा उपक्रम म्हणजे तंत्रज्ञान, वर्तनशास्त्र आणि आरोग्यसेवा यांचा संगम आहे. या कार्यक्रमामुळे पालकांचे ज्ञान, सहभाग आणि आरोग्य प्रणालीवरील विश्वास वाढला असून, महाराष्ट्राने पुन्हा एकदा डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात राष्ट्रीय नेतृत्व सिद्ध केले आहे.

# परळीत जयश्रीताई गीते यांची बिनविरोध निवड झाल्याने शिवसेनेची दमदार एन्ट्री : सचिन मुळूक

बीड ।प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली सचिव संजय मोरे साहेब मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब, समन्वयक व निरीक्षक मनोजजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परळी नगरपरिषदेच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत महायुती आणि शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार जयश्रीताई गीते यांची आज शुक्रवारी (दि.२१) बिनविरोध नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली. राज्यातील राजकीय वातावरणात परळीच्या स्थानाला विशेष महत्त्व असल्याने या निकालाकडे सर्वांचे लक्ष होते. विरोधी पक्षातील कोणत्याही उमेदवाराने नामांकन अर्ज दाखल न केल्याने जयश्रीताई गीते यांचा विजय निश्चित झाला.शिवसेना संपर्कप्रमुख बापूसाहेब



मोरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक , टी.पी. मुंडे सर ,तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे ,शहर प्रमुख वैजनाथ माने यांच्या नेतृत्वाखाली परळीत शिवसेनेने मजबूत पायाभरणी केली असून, या बिनविरोध विजयाने त्या संघटनात्मक ताकदीला औपचारिक शिक्का बसला आहे. परळी पालिका निवडणुकीत जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रयत्नांना पहिल्याच टप्प्यात यश आले असून शिवसेनेची स्थानिक पातळीवरील सक्रिय भूमिका, आणि विकासाच्या प्रश्नांवर घेतलेली भूमिका, कार्यकर्त्यांनी मतदारांशी केलेला सातत्यपूर्ण संपर्क याचा लाभ गीते यांच्या विजयानंतर स्पष्टपणे दिसून आला. दरम्यान, जयश्रीताई गीते यांच्या बिनविरोध निवडीचे श्रेय स्थानिक कार्यकर्त्यांची मेहनत, महायुतीमधील समन्वय आणि शिवसेनेच्या नेतृत्वक्षमतेला दिले जात आहे.

**परळी नगरपालिका महायुतीच्या ताब्यात येणार : मुळूक**

यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की ही फक्त एका जागेची निवड नाही, तर परळीतील मतदारांनी शिवसेना राष्ट्रवादी व भाजप च्या महायुतीवर दाखवलेला विश्वास आहे. या विजयामुळे परळी नगरपालिका महायुतीच्या ताब्यात येणार असल्याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परळीच्या विकासाचे आराखडे आखून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी आता आम्ही आणखी सक्षमपणे काम करणार असल्याचे मुळूक म्हणाले.

## सामाजिक सुरक्षा व आर्थिक विकासासाठी घड्याळाला मतदान करा - सौ.शितलताई दाभाडे

गेवराई ।प्रतिनिधी

माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आ. विजयसिंह पंडित यांनी नेहमीच गेवराई विधानसभा मतदार संघाच्या विकासाच्या मुद्यावर राजकारण केलेले आहे. सामाजिक सुरक्षा व आर्थिक विकास हाच त्यांच्या कामाचा केंद्रबिंदू आहे. या मुद्यावर त्यांची चालू असलेली यशस्वी वाटचाल विरोधकांना खूपत आहे. त्यामुळे विरोधक भावनिक राजकारण आणि भुलथापा देऊन अपप्रचार करत आहेत. विरोधकांचा डाव ओळखून विकासाच्या मुद्यावर माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना घड्याळाला मतदान करून मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांनी केले. प्रभाग क्र.११ मधील प्रचार दौऱ्यात मतदारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.



यावेळी उमेदवार माधव बेद्रे, वसीम फारुकी यांच्यासह दत्ताभाऊ पिसाळ, जालिंदर पिसाळ, शैलेश तोष्णीवाल, विनोद मोरे, शरीकभाई, बाळू पिसाळ, महेश मिसाळ, अशोक हातागळे, बाळू हातागळे, मन्सूरभाई, महिला आघाडीच्या सौ.मुक्ताताई आर्दड, सौ.पल्लवी गोगुले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृध्द महिलेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास जन्मठेपीची शिक्षा

### जिल्हा व सत्र न्यायधीश २ मा. एम. आर शिटे मॅडम यांचा महत्वपूर्ण निकाल

बीड ।प्रतिनिधी

दिनांक. २९.१२.२०२२ रोजी आरोपी याने वृध्द महिलेवर पहाटे ०३.०० वाजणेच्या सुमारास वृध्द महिला झोपलेली असतांना आरोपी याने वृध्द महिलेस हाणमार करून तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गेवराई येथील रहिवाशी असलेल्या आरोपीस मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश - २ भा. एस.आर.शिदे मॅडम यांनी आरोपीस दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास व कलम ३२३ भादवी प्रमाणे १ महिना सश्रम कारावास एवढी शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. बी. एस. राख यांनी काम पाहिले.

रोजी पहाटे ०३.०० या प्रकरणी थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक २९.१२.२०२२२ वाजणेच्या सुमारास पिडीता ही गेवराई यस स्थानकाच्या बाजूला झोपलेली असतांना आरोपीने पिडीतेच्या तोंडावर हात ठेवून तोंड दाबले, मारहाण केली व वृध्द महिलेवर बळजबरीने लैंगिक आयाचार केला. पीडितेस मारहाणीमुळे जखमा झाल्या त्यामुळे तीस उठता आले नाही तिने सकाळी रत्यावरून जाणाऱ्या व्यक्तीस बोलावून तिच्या मुलास फोन करण्यास सांगितले त्यानंतर वृब्द महिलसे औषध उपचार कामी उपजिल्हा रुग्नालय गेवराई येथे शरीक करण्यात आले. त्यानंतर पिडीतीने



फिर्याद दिली.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी विरूध्द कलम ३२४,३७६ (२) (एम) भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तत्कालीन सपोनि श्री. एस.अ.काळे, गेवराई पोलीस स्टेशन यांनी या प्रकरणाचा तपास केला व दोषारोपपत्र प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गेवराई येथे दाखल करण्यात आले व सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे वर्ग करण्यात आले.

सदर प्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ मा. एस. आर. शिदे मॅडम यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणात पिडीता, पंच, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी व साक्षीदार यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल श्री. बी. एस. राख यांचा युक्तीवाद ग्राहय धरूनम आरोपी नामे ज्ञानेश्वर लक्ष्मण मुंबर्डे यास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ मा. एस.आर.शिदे मॅडम यानी आरोपीस दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास एवढी शिक्षा ठोठावली आहे.सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल श्री बी. एस. राख यांनी काम पाहिले त्यांना जिल्हा सरकारी वकील श्री अजय दि. राख यांनी मार्गदर्शन केले तपास अधिकारी पोनि श्री एस.अ.काळे व पैरवी अधिकारी -ड/५३९ श्री. सुरेश धोंडिराम जाधव, श्रीमती. एस.ए. चव्हाण, महिला पोलीस अंमलदार यांनी सहकार्य केले.

## डोंगराळेतील ३ वर्षांच्या यज्ञावर अमानुष अत्याचार व हत्या, सुवर्णकार समाजात संतापाची लाट दोषींना तात्काळ फाशीची मागणी

लातूर ।प्रतिनिधी

मालेगाव तालुका (जि. नाशिक) येथील मौजे डोंगराळे गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुकली कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर झालेल्या क्रूर अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. या भीषण घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशन, लातूर यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

संघटनेने आपल्या निवेदनात म्हणटले आहे कीं निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना फाशीची शिक्षा व्हावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे नमूद केले.टसरच या निवेदनत:सदर गुन्हा फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करून



खटला तातडीने चालवावा.दोषींना फाशीची शिक्षा होण्यासाठी आवश्यक पाठपुरावा संबंधित प्राधिकरणांकडे तातडीने करावा.अशा घृणास्पद घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या.अश्या मागण्या करण्यात आल्या असून सदर निवेदन लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशनचे अध्यक्ष राजाभाऊ हरिभाऊ बोकन यांच्या नेतृवाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे, तालुका अध्यक्ष राहुल भुतडा, समाजाचे गजेंद्र बोकन, शिवसेनेचे आकाश बजाज, गणेश बेद्रे, पुष्कर उपाध्याय आदी मान्यवर उपस्थित होते.निवेदनाद्वारे समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन या गंभीर प्रकरणात न्याय मिळावा आणि गुन्हेगारांना आदर्श शिक्षा व्हावी, अशी ठाम भूमिका सोनार समाजाने घेतली आहे.

# तुलसी शैक्षणिक समूहाची आंतरराष्ट्रीय झेप

### वेलनेस आणि ब्युटी शिक्षणासाठी कोरियन वेलनेस नेटवर्कसोबत ऐतिहासिक करार

बीड ।प्रतिनिधी

मराठवाड्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुलसी शैक्षणिक समूहाने वेलनेस आणि ब्युटी शिक्षण क्षेत्रात जागतिक सहकार्याची दिशा दाखवणारे महत्त्वपूर्ण पाऊल टाकत दक्षिण कोरियातील कोरियन वेलनेस नेटवर्क सोबत लेटर ऑफ इंटरेस्ट (एलओआय) वर स्वाक्षरी करून जागतिक दर्जाच्या संयुक्त शिक्षण कार्यक्रमांचा मार्ग मोकळा केला आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा महत्त्वपूर्ण करार रविवार, दि.१६ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे संपन्न झाला. या वेळी कोरियन प्रतिनिधी म्हणून कोऑपरेटिव्ह एम्प्लॉयमेंट मूव्हमेंट नॅशनल मुख्यालय, सियोलचे चेअरमन चोई यंग हो, कोरियन बुद्धिस्ट युनिव्हर्सिटीचे व्हाईस चान्सलर आणि प्रख्यात धम्माचार्य डॉ. ली ची रान तसेच वर्डेस्क स्ट्रॅटेजी प्रा.लि., पुणेचे



सल्लागार आयु. नितीन साळवे उपस्थित होते. तुलसी एज्युकेशनल इन्स्टिट्यूटतर्फे प्रा.प्रदीप रोडे यांनी प्रतिनिधित्व केले.करारानंतर चेअरमन चोई यंग हो यांनी भारतीय विद्यार्थ्यांना कोरियन वेलनेस-ब्युटी उद्योगातील उच्च दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. ली ची रान यांनी, या उपक्रमामुळे भारत-दक्षिण कोरिया शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील, असे मत व्यक्त केले. तर प्रा. प्रदीप रोडे यांनी, या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप, प्रगत कौशल्यविकास आणि जागतिक रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, असे नमूद केले.

या संपूर्ण प्रकल्पाचा समन्वय आयु.नितीन साळवे यांच्या माध्यमातून करण्यात आला. या महत्त्वाच्या क्षणी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा आयु. दीपा रोडे, डॉ. प्रियांका रोडे, इंजि. दीपंकर रोडे तसेच समूहातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालेगाव येथील बलात्कार व हत्याकांडातील आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे -ॲड. सुभाष राऊत

बीड ।प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील चार वर्षीय चिमुकलीच्या बलात्कार व हत्याकांडाचा वेगवान व नि:ष्पक्ष तपास करून दोषीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी अखिल भारतीय समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड.सुभाष राऊत यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील केवळ चार वर्षांच्या निरागस बालिकेवरील अमानुष अत्याचार आणि हत्या ही मानवतेला कलंकित करणारी घटना आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड संताप उसळला असून कायदा - सुव्यवस्थेवर जनतेचा विश्वास ढासळत चालला आहे. या प्रकरणाचा अत्यंत वेगाने, काटेकोरपणे आणि पूर्णपणे नि:ष्पक्ष तपास व्हावा. दोषी आरोपीला शक्य तितक्या लवकरात लवकर फाशीपर्यंतची कठोरातील कठोर शिक्षा मिळावी. लहान बालकांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांना आळा



**महात्मा फुले समता परिषद आणि श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सव समितीच्यावतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर**

घालण्यासाठी शासनाने ठोस धोरण आखावे. पीडित कुटुंबास तात्काळ मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत व योग्य भरपाई देण्यात यावी. या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून निष्पाप बालिकेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंतीचे संस्थापक तथा प्रणेते ड. संदीप बेदरे यांनी केली आहे. याप्रसंगी सोनार समाजाचे बाबासाहेब पंडित, समता परिषदेचे शहराध्यक्ष निखिल शिंदे, नितीन राऊत, शरद विटकर, सचिन सातपुते, महेश व्यवहारे, महेश शिंदे, समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक व सोनार समाजातील नागरिक आदींची उपस्थिती होती.

## प्रगणनेच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी इच्छुक संस्थांनी संपर्क साधावा

बीड ।प्रतिनिधी

केंद्र शासनाकडुन शासन राष्ट्रव्यापी लघुसिंचन योजनांची (०-२००० है. सिंचन क्षमता) ७ वी प्रगणना आणि जलसाठ्यांची २ री प्रगणना करण्यात येत आहे. त्यामध्ये खालील योजनांचा समावेश होणार आहे. १) भुपृष्टाखालील जलसाठ्यांच्या वापरासाठी योजना साध्या विहीरी, उथळ, मध्यम व खोल कूपनलिका २) भुपृष्ठावरील जलसाठ्याच्या वापरासाठी योजना ० ते २००० है, सिंचन क्षमतेचे लघु सिंचन योजना, धरणा कालवे, बंधारे, विमोचक, बंद नलिका वितरण प्रणाली इत्यादीमुळे केले जाणारे प्रवाही सिंचन आणि नदी, नाले, बंधारे, जलाशय इत्यादीवरील उपसा सिंचन योजना. ३) नागरी आणि ग्रामीण भागातील जलसाठे (थरींशी इेवळशी) व २००० हेक्टर वरील सिंचन क्षमतचे मोठे व मध्यम प्रकल्प आणि उपसा सिंचन योजना इ.४) कृषी व मृद संधारण विभागाकडील सिमेंट बंधारे, शेततळे, सिंचन विहिरी इ.५) भुजल सर्वेक्षण यंत्रणे संबंधीत कुपनलिका इ.

सदरील प्रगणनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यामध्ये काम करण्याकरिता इच्छुक संस्थांनी दि. २६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आपले प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच अनुभवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. तसेच उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात यावे. केंद्र शासनाकडुन बैठकीमध्ये सदरील प्रगनणा दि ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

प्रस्तावावरती चर्चा करुन संस्थेची निवड करण्यात येईल व अंतिम निर्णय हे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचेकडे राखीव राहतील.अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधावा.कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जायकवाड़ी कॉलनी नगर रोड बीड-४३११२२ येथे संपर्क साधवा.

# गेवराईच्या विकासासाठी राष्ट्रवादी शिवाय पर्याय नाही - भास्कर खडके

गेवराई ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित विकासाभिमुख भुमिका गेवराई शहरासह तालुक्यातील जनतेच्या लक्षात आलेले आहे. रस्ते, पाणी आणि इतर मुलभूत सुविधांच्या विकासासाठी अमरसिंह पंडित यांनी आत्तापर्यंत मोठी कामगिरी केलेली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही आता काम करणार असून भाजपच्या विद्यमान नेतृत्वाने आमचा विश्वासघात केला आहे. गेवराई शहराच्या विकासासाठी राष्ट्रवादी शिवाय पर्याय नाही त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह सर्व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे कट्टर समर्थक भास्कर खडके यांनी केले. भास्कर खडके यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह माजी आमदार



अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला यावेळी ते बोलत होते.

प्रभाग क्र.९ मधील भाजपाचे सक्रीय कार्यकर्ते भास्कर खडके यांच्यासह गंगाधर खडके, श्रीकिसन खडके यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, कृष्णा मुळे, मनोज हजारे, विलास ठाकूर, संजय ढोने, दत्ता दाभाडे, महेश औटे, राजू जवंजाळ, स्वप्निल मोटे, अमोल होंडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुस्लिम समाजासाठी शिवछत्र परिवाराने बहुमोल काम केले - हबीबभाई पठाण

भाजपाचे सक्रीय कार्यकर्ते हबीबभाई पठाण यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी ते म्हणाले,भाजपाच्या विद्यमान नेतृत्वाने आमची दिशाभूल केली. मुस्लिम समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित ठेवले, मात्र कसल्याही प्रकारचा दुजाभाव न करता अमरसिंह पंडित यांनी मुस्लिम समाजासाठी गेवराई शहरात शादीखाना उभारला, कब्रस्थानांना संरक्षण भिंती बांधल्या हे काम अतिशय मोलाचे आहे. शिवछत्र परिवाराशिवाय कोणीही विकासाचे कामे करू शकणार नाही, त्यामुळे गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये शिवछत्र परिवाराचे हात बळकट करण्यासाठी राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# पाण्याचा काटकसरीने वापर करुन सहकार्य करण्याचे अवाहन

बीड ।प्रतिनिधी

माजलगांव प्रकल्प उजवा कालवा कि.मी. ० ते १०१ वरील वितरीका, मायनर इत्यादीवर सुलभ रितीने पाणी पोहचेल अशा सर्व प्रवाही तसेच जलाशय, कालवा व नदीनाले उपसा वरील मंजुरी प्राप्त सर्व लाभधारकांनी रब्बी हंगाम सन २०२५-२६ मध्ये हंगामी पिकाना, प्रकल्पातील पाणी साठा उपलब्धतेनुसार व प्रकल्पीय पीक रचनेनुसार पाणी पाळीत पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे. पाणी पाळी तारखा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्या नंतर जाहिर करण्यात येतील.उपलब्ध साठ्यापैकी पिण्यासाठी/औद्योगीक वापरासाठी प्राधान्याने आरक्षित केलेले पाणी साठा वगळता उर्वरीत पाणी साठा सिंचनासाठी वापरला जाईल.

तरी सर्व लाभधारकांनी आपले पाणी अर्ज संबंधीत शाखा कार्यालयात दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत सर्व त-हेने पूर्ण करुन दाखल करावेत व पोहंच पावती घ्यावी. पाणी अर्ज नमुना नं.७ व ७अ संबधीत शाखा कार्यालयात विनामुल्य मिळतील. मुदतीनंतर आलेल्या पाणी अर्जाचा विचार केला जाणार नाही.

रब्बी हंगामी पिके :- गहु, ज्वारी, हरभरा, सुर्यफूल, कापुस, तुर, इतर हंगामी पिके ऊस (हंगामी मंजूरी) हंगाम कालावधी : १५/१०/२०२५ ते २८/०२/२०२६ पर्यंत आहे

नियम व अटी

पाणी अर्ज भरताना अर्जदार थकबाकीदार नसावा.पाणी अर्ज ७/१२ च्या उता-यासह २० आरच्या पटीत सादर करावेत.कालव्याची चारी व विहीर/बोअरचा पाट यामध्ये कमीत कमी १० फुटाचे अंतर असावे.जलाशय, कालवा, नदीनाले यावरील उपसा सिंचनाने पाणी घेणा-या लाभधारकाकडे उपसा सिंचनाचा परवाना असणे आवश्यक आहे.सर्व कार्यान्वीत सहकारी पाणी वापर संस्था यांचे चेअरमन यांनी आपले कार्यक्षेत्रातील सिंचन होणारे अपेक्षीत क्षेत्र (प्रवाही/उपसा) व त्या साठीची पाणी मागणी ही संबधीत शाखा कार्यालयाकडे विहीत कालावधीत नोंदवावी.

शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानिक उपकर लावला जाईल,आपल्या शेतातील शेतचारी सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबधीत शेतक-याची राहील. शेतचारी नादुरुस्त असल्यास पाणी पुरवठा केला जाणार नाही. तसेच तुट फुटीमुळे नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.मंजूर क्षेत्रालाच पाणी घ्यावे, मंजुर क्षेत्रापेक्षा जादा क्षेत्र भिजविल्यास जादा क्षेत्रास सब्बापट दराने व पाणी अर्ज न देता क्षेत्र भिजविल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दिडपट दराने दंडनिय आकारणी करण्यात येईल.

पाणी पाळीच्या कालावधीत कालवा रात्रंदिवस चालू राहत असल्याने आपले पाणी पाळीनुसार रात्रीच्या वेळीही पाणी घेण्याची जबाबदारी संबंधीत लाभधारकाची राहील.मंजूर पिकास पाण्याचे प्रत्येक पाळीत शेजपाळी प्रमाणे कालव्याच्या/वितरीकेच्या पुच्छ भागाकडून क्रमशः शिर्ष भागाकडे (ढरळश्रें हशरव) पाणी देण्यात येईल. तरी शेजपाळीचे काटेकोरपणे पालन करावे. महाराष्ट्र सिंचन कायदा १९७६ च्या प्रचलित नियमानुसार मंजूरी देण्यात येईल, त्याचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल. उपलब्ध पाणी साठयापैकी पिण्यासाठी/औद्योगिक वापरासाठी आरक्षीत केलेला पाणी साठा वगळता उर्वरित पाणी साठा सिंचनासाठी वापरण्यात येईल.तरी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करुन सहकार्य करावे असे अवाहन माजलगाव पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता परळी वैद्यनाथ यांनी केले आहे.

# त्रिभाषा धोरण निश्चिती समिती बुधवारी

## छत्रपती संभाजीनगर विभागात येणार !

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार दि.२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला. शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. समिता जाधव, डॉ. एम.एफ. मेवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे आदी उपस्थित होते.बैठकीत माहिती देण्यात आली की. त्रिभाषा धोरण निश्चिती समिती दि.२५ रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार




दि.२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे. त्यात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था चालक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रसार माध्यम प्रतिनिधी, शिक्षक- पालक संघ आदी उपस्थित राहतील. त्यांचे म्हणणे समिती जाणून घेईल.

समितीचे स्वरुपः-अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य- डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अप्रणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान. समिती येणाऱ्या सर्व घटकांतील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेईल. तसेच संवाद साधेल,असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यातील लोक सहभागी होऊन आपले म्हणणे सादर करतील. बाहेरील जिल्ह्यातील लोकांना म्हणणे सादर करण्या करीता ज्यांना येथे येणे शक्य नाही त्यांच्यासाठी त्या त्या जिल्ह्यातून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# परळीत काँग्रेस-वंचित आघाडीच्या प्रचाराचा आज

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते शुभारंभ

प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमास उपस्थित रहा- अडि.प्रकाश मुंडे

परळी ।प्रतिनिधी

परळी नगरपरिषद निवडणुकीची वातावरणनिर्मिती जोर धरत असताना, काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी आज आपल्या प्रचार मोहिमेचा दणदणीत शुभारंभ करणार आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते हा प्रचार आज सकाळी ११ वाजता मोंढा मार्केट येथे सुरू होणार आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या उपस्थितीमुळे हा कार्यक्रम परळीत मोठे राजकीय आकर्षण ठरणार आहे. तरी परळी शहरातील मतदार बांधवांनी व नागरिकांनी मोठी संख्येने उपस्थित राहावे- काँग्रेसचे अध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदांची निवडणूक लढविण्यात येत आहे. या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ शनिवार,दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. शहरातील मोंढा मार्केट येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडण्यात येईल. माजी राज्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या प्रचार शुभारंभ कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारणी सदस्य अमित भुईगळ ,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेशभाऊ कांबळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती



राहणार आहे.परळी शहरातील सर्व नागरिकांनी आणि सुजाण मतदारांनी या भव्य प्रचार शुभारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आघाडीच्या



विजयावर शिक्कामोर्तब करावे,असे आवाहन काँग्रेसचे अध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

# शासनाचा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार बाबासाहेब चव्हाण यांना जाहीर

बीड ।प्रतिनिधी

बीड पंचायत समिती अंतर्गत असलेल्या चौसाळा ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांना महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

बीड तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ आणि लोकसंख्येने सर्वाधिक असलेल्या चौसाळा ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या अनेक योजना प्रभावीपणे आणि यशस्वीरित्या



पार पाडण्याचे काम ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांनी केले. यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, आर.आर.पाटील आबा स्मार्ट ग्राम ग्रामपंचायत अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, वृक्ष लागवड व शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या योजना गावात सामान्य लोकांपर्यंत प्रभावीपणे राबविल्याबद्दल बाबासाहेब चव्हाण यांच्या उत्कृष्ट कार्याची शासन स्तरावर दखल घेत महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार बाबासाहेब चव्हाण यांना जाहिर करण्यात आला आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

# पंडित-पवार यांच्या दळभद्री युतीला

## गेवराईकर कधीच स्विकारणार नाही- दिपक आतकरे

गेवराई ।प्रतिनिधी

बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांनी केलेली युतीही गेवराईच्या विकासासाठी नसून ही वैयक्तिक स्वार्थासाठी झालेली दळभद्री युती आहे. या अगोदरही ते एकमेकांवर आरोप करत नव्हते. कायम त्यांची आतून छूपी युती असायची ती आता उघड झाली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराईकरांना विकास काय असतो हे प्रत्यक्ष काम करून दाखवून दिले आहे. विकासाच्या मुद्यावर नगर परिषदेची निवडणुक होत असल्याने निवडणुकीच्या तोंडावर झालेली पंडित-पवार ही दळभद्री युती गेवराईकर कदापि स्विकारणार नाही असे



प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिपक आतकरे यांनी केले. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या संवाद दौऱ्यात ते बोलत होते.

# २३ नोव्हेंबर रोजी लातूर जिल्ह्यात १२ हजार ५८९ विद्यार्थी देणार महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

लातूर ।प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील ३२ परीक्षा केंद्रांवर २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा सन २०२५-२६ आयोजित करण्यात आली आहे. सकाळच्या सत्रात २१ परीक्षा केंद्रावर व दुपारच्या सत्रात ३२ परीक्षा केंद्रावर परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. पेपर- १ करिता सकाळी १०.३० ते १.०० या सकाळच्या सत्रात ९ हजार ३४६ व पेपर- २ करिता पेपर-२ दुपारी २.३० ते ५.०० या वेळेत दुपारच्या सत्रात १२ हजार ५८९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यात आलेले आहेत. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची सकाळी ९ पासून फ्रिस्कींगद्वारे तपासणी केली जाणार आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी सर्व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी वेळवर उपस्थित रहावे, असे अवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे, जिल्हा परिरक्षक प्रमोद पवार यांनी केले आहे.

# सिपेटमध्ये बेरोजगार युवक, युवतींसाठी निवासी

## कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

राज्यातील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी), अपंग (पीडब्लुडी) व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या (इडब्लुएस) प्रवर्गातील युवक व युवतींकरीता प्लॅस्टिक प्रोसेसिंग तंत्रज्ञान संबधी ४ महिने कालावधीच्या नि:शुल्क रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता (निवासी) केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) या रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायने व खत मंत्रालय भारत सरकार च्या अंतर्गत संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात आले आहेत.

प्रशिक्षणार्थींची निवड २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे मूळ कागदपत्रांची तपासणी करून व मुलाखती द्वारे करण्यात येणार आहेत. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणताही प्रवास भत्ता किंवा शुल्क दिले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांची २६ नोव्हेंबर,२०२५ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. अर्जाचा नमुना .ळळशिीं.सीं.ळप या वेबसाईट वर उपलब्ध आहे. तरी प्रशिक्षणास इच्छूक पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून व आवश्यक सर्व शैक्षणिक कागदपत्र (साक्षांकित प्रती), फोटोसहित सिपेट - छत्रपती संभाजीनगर पत्त्यावर पाठविण्यात यावे. अधिक माहितीसाठी: ९३२५६८७९१०, ९६०१३६४५५०, ९१४५६७५५८५ या क्रमांकावर अथवा ींिल-रीीरपसरलरवलळशिीं.सीं.ळप या ई-मेलवर संपर्क साधावा.

या निवासी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे प्रायोजक सॅबीक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसआयपीएल) हे आहेत. सिपेट भारत सरकारची प्लॅस्टिकमध्ये प्रशिक्षण देणारी अग्रणी संस्था असुन सॅबीक इंडिया प्रायव्हेट लि. (एसआयपीएल) हरियाणा यांच्या सहाय्याने सीएसआर अंतर्गत मशिन ऑपरेटर - प्लॅस्टिक प्रोसेसिंग (एमओ-पीपी) कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना प्लॅस्टिक प्रोसेसिंग तंत्रज्ञान संबधी प्रशिक्षण दिले जाते. ज्यामुळे त्यांना नामांकित उद्योगामध्ये रोजगार प्राप्त करता येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ४ महिने (६०० तास) असून ५५ जागा असणार आहे. यासाठी वयोमर्यादा १८-३० वर्षे राहणार आहे. प्रशिक्षणासाठी निवड होण्यासाठी ११ वी उत्तीर्ण किंवा १० वी उत्तीर्ण आणि १.५ वर्षाचा संबंधित अनुभव किंवा ८ वी उत्तीर्ण आणि ४.५ वर्षांचा संबंधित अनुभव किंवा संबंधित एनएसक्युएफ स्तर ३ आणि १.५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. प्रशिक्षणाच्या निवडीसाठी वयोमर्यादा अनुसूचीत जाती, जमाती करीता ०५ वर्ष आणि इतर मागासवर्गीयांकरीता ०३ वर्ष शिथील असणार आहे.निवासी प्रशिक्षणाकरीता पात्र प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणार आहे. यापूर्वी सिपेट -छत्रपती संभाजीनगर येथून प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षणार्थी पात्र असणार नाहीत.

# बीडमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने रणसिंग फुंकले

## आ.सना मलिक यांचे प्रेमलता पारवे व नगरसेवकांच्या विजयासाठी पायी वादळ





बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम मित्रपक्षाने प्रचाराचे मैदान दणाणून सोडले आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे आणि सर्व नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या फायर ब्रँड नेत्या आ.सना मलिक यांनी आज बीड शहरात पायी रॅली आणि वादळी कॉर्नर सभांचा झंझावात उभा केला.

बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या आ.सना मलिक यांच्या पायी प्रचार रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीमध्ये उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे, फारुक पटेल, प्रिया डोईफोडे, अशफाक इनामदार, बिलाल शेख, मोईन जकीरोद्दीन, जैतुल्ला खान, सादेकुजमा, गोडसे मिना मनोज, मोमीन जुबेर, हफीज अशफाक यांच्यासह शेख तय्यबभाई, शेख मुजीबभाई, शेख जमीलमामू, अलिम पटेल, शेख शकील, शेख इम्रान, आबेद इनामदार, शेख फहीम, ड.सय्यद खाजा, कुस्तीपटू अलफीया शेख आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाचे अनेक प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून उपस्थित होते.

सायंकाळी ४ ते ५ या वेळेत प्रभाग क्र.६ मध्ये आ.सना मलिक यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोठी पायी रॅली काढण्यात आली. कारंजा टॉवर येथून निघालेल्या या पायी वादळाने अजिजपूरा, किल्ला मैदान, बलभीम चौक, कारंजा आणि जुना बाजार पर्यंतचा परिसर अक्षरशः घड्याळमय करून टाकला. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या नागरीकांनी आ.मलिक यांचे जोरदार स्वागत केले. रॅलीच्या माध्यमातून त्यांनी लाखो मतदारांचे काळीज जिंकले. त्यानंतर झालेल्या कॉर्नर सभातून विरोधकांचा समाचार घेतला, पायी रॅलीनंतर आ.सना मलिक यांनी थेट मतदारांशी संवाद साधत विरोधकांच्या धोरणावर जोरदार हल्लाबोल केला. मोमीनपुरा येथील सभेत देखील आ.मलिक यांनी उपस्थित मतदारांना मार्गदर्शन करून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाच्या सर्व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन केले.

# तक्रारीचा योग्य न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खाते

## डाक अदालत घेणार

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

देशातील पोस्टल सेवा ही सामाजिक आर्थिक जीवनाचा एक अविभाज्य आग आहे देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये उपारोषपणने डाकघराच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करून प्रभावित केले आहे. पोस्ट खाते है लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचे प्रयत्न करते. ही सेवा देताना पत्र व्यवहारामध्ये किंवा सेवेमध्ये काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात कि त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते, ह्या तक्रारीचा योग्य न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्याने डाक अदालत घेण्याचे ठरवले आहे, त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करतात.

पोस्टमास्तर जनरल, औरंगाबाद-४३१००२ द्वारे दि. २५.११.२०२५ रोजी ११.०० वाजता पोस्टमास्तर जनरल, औरंगाबाद-४३१००२ यांच्या कार्यालयात डाक अदालत आयोजित करण्यात येणार आहे.औरंगाबाद क्षेत्र संबधित टपाल सेवेविषयी किवा कामकाजा बद्दल ज्या तक्रारीचे निवारण सहा आठवड्याच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तकारीची या डाक अदालत मध्ये दखल घेतली जाईल. विशेषता टपाल वस्तू / मनी ओर्डेर बचत बैंक खाते / प्रमाणपत्र इत्यादीबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तकारीचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मुल तक्रार पाठविली असेल त्याचे नाव व हुद्धा इत्यादी.संबधितानी डाक सेवे बाबतची आपली तक्रार श्री अ ख शेख, सहायक निदेशक डाकसेवा (जनशिकायत) पोस्टमास्तर जनरल, यांचे कार्यालय औरंगाबाद-४३१००२ यांचे नावे दोन प्रति सह दी. २१.११.२०२५ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# भाजपचे ज्येष्ठ नेते विलास अण्णा सांजेकर यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार गट) मध्ये जाहीर प्रवेश!

धाराशिव /प्रतिनिधी

भाजपचे ज्येष्ठ नेते विलास अण्णा सांजेकर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये जाहीर प्रवेश केला. प्रभाग क्रमांक ३ मध्ये पक्षाकडून पुरस्कृत उमेदवार म्हणून विलास अण्णा यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या वेळी पक्षाचे पूर्वीचे अधिकृत उमेदवार अक्षय साळुंखे यांनी पक्षहिताला प्राधान्य देत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि विलास अण्णा सांजेकर यांना संपूर्ण पाठिंबा जाहीर केला.

प्रवेशावेळी बोलताना विलास अण्णा म्हणाले, अनेक वर्षे भाजपमध्ये काम केले, परंतु न्याय मिळाला नाही. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(शरदचंद्र पवार ) मध्ये मला सन्मान आणि योग्य न्याय मिळाला.



या सोहळ्यात विलास अण्णा सांजेकर यांच्या सोबत अजय सूर्यवंशी, सुजित पवार, सुनील शेळके, उमाकांत आप्पा पवार, प्रशांत पोतदार, पंकज सोनटक्के, सुजित गायकवाड, हर्षल वाघमारे, सिद्धांत सोनवणे, रुकेश पाटील, मंगेश नाईक, वैभव कोंडेकर, शुभम शिंदे, राहुल चौरे, सोमनाथ लोहार, आकाश गोरे, सिद्धार्थ गायकवाड, दिनेश मिटकरी, अमित पोतदार, अखलाख शेख, शंभु शेरकर, दिपक कोकाटे, शरद सोनवणे, सुमित गायकवाड, यश कांबळे, आदित्य गायकवाड, मानव सांजेकर, राज पाटील, स्वप्नील बनसोडे, शोएब खान, मोईज अन्सारी, मिलिंद आदटराव, अमन शेख, अक्षय डुकरे, सागर झोंबाडे, आशिष तडवळकर, श्रीकांत जगदाळे आणि भूषण माने यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार ) मध्ये प्रवेश केला.या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील,माजी उपनगराध्यक्ष खलिफा कुरेशी,प्रदेश सरचिटणीस मसूदभाई शेख,डॉ.सेलचे जिल्हाध्यक्ष अविनाश तांबारे,नगरसेवक बाबा मुजावर,अण्णा गायकवाड,अमोल सुरवसे,उपाध्यक्ष जयंत देशमुख, ड. योगेश सोन्ने पाटील आणि ड.अविनाश जाधव,रवि ठेंगील यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग क्रमांक ३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढवणारा हा ऐतिहासिक निर्णय ठरला असून बदलाची दिशा आता अधिक स्पष्ट दिसू लागली आहे.

## बोबडेवाडी येथील युवक ज्ञानेश्वर आदमाने यांची भारतीय सैन्य दलात भरती झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील ज्ञानेश्वर भाऊसाहेब आदमाने याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने पंचायत समिती सदस्य शिवाजी ऊर्फ बंडू चौधरी व ग्रामस्थांनी कुटुंबाचा हृदय सत्कार केला.याप्रसंगी भैरू दामोदर चौधरी सर पैठण माजी चेअरमन,उपसरपंच बाबासाहेब बोबडे,माजी सरपंच निरंजन बोबडे, माजी सरपंच नवनाथ क्षीरसागर दिपक कोटुळे, मोहनराव बोबडे,गांजी गावचे माजी उपसरपंच सतीष जाधव,संजय बोबडे,भैया जाधव व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.या वेळी बोलताना ज्ञानेश्वर आदमाने यांनी देशाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे याचा आपल्याला सार्थ अभिमान असुन बोबडेवाडी गावाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




## शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'सत्यमेव जयते फार्मर कप' मध्ये सहभागी व्हावे –ज्ञानेश्वर इधाटे

बदनापूर (प्रतींनिधी) –शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'फार्मर कप स्पर्धा ही पानी फाउंडेशनद्वारे आयोजित केली जाणारी एक गटशेती स्पर्धा आहे. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी, शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्यासाठी आणि शेतकरी समृद्धीसाठी ही स्पर्धा राबवली जात असून या स्पर्धेत, कमीत कमी ११ सदस्य आणि १५ एकर जमीन असलेला कोणताही गटांनी सहभागी होण्याचे आवाहन पाणी फाऊंडेशन तर्फे

जालना व बुलढाणा विभागीय समन्वयक ज्ञानेश्वर इधाटे यांनी बदनापूर येथील कृषी विद्यान केंद्र येथे आयोजित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात केले.पुढे बोलताना ते म्हणाले की, फार्मर कप स्पर्धेची मुख्य वैशिष्ट्ये गटशेतीला प्रोत्साहन: शेतकरी गटांनी एकत्र येऊन काम करावे यासाठी ही स्पर्धा आहे, ज्यामुळे मजुरी आणि इतर खर्चात बचत होते. उत्पादन खर्च कमी करणे: शास्त्रीय आणि शाश्वत शेती पद्धतींचा वापर करून उत्पादन खर्च कमी करणे हा मुख्य उद्देश आहे. उत्पादकता वाढवणे: गटशेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढविणे या स्पर्धेच्या विस्तारासाठी राज्य शासनही पानी फाउंडेशनला सहकार्य करत आहे, चार वर्षांत, महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांत यशस्वी झाल्यानंतर, जानेवारी २०२६ पासून ही स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३५१ तालुक्यांत होणार असल्याचे यावेळी संगितले तर उपविभाग समन्वयक असलम बेग यांनी अधिकाधिक शेतकरी गटांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन केले.तसेच प्रशिक्षक किशोर इंगोले, बाळासाहेब चव्हाण, महादेव निपाणे यांनी शाश्वत शेती, संसाधनांचा योग्य वापर, प्रशिक्षणाची प्रक्रिया आणि पारितोषिकांची माहिती दिली. हे प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक गहिनीनाथ कापसे , जिल्हा कृषी उपसंचालक श्री संजय कायंदे सर,उपविभागीय कृषी अधिकारी श्री प्रशांत पवार जिल्हा कृषीअधिकारी कार्यालय जालना,तसेच तालुका कृषी अधिकारी गोपाल गुजर ,कृषी कार्यालय बदनापूर, तालुक्यातील सर्व सहाय्यक कृषी अधिकारी यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.

## पूर्णवादी बँकेची आष्टीत भव्य उंच भरारी

# अत्याधुनिक नव्या वास्तूचे लोकार्पण – विश्वास, विकास आणि आधुनिकतेचा सुवर्ण संगम

मान्यवरांच्या गौरवशाली उपस्थितीत आष्टी शाखेच्या नव्या अध्यायाची ऐतिहासिक सुरुवात

आष्टी – (प्रतिनिधी) पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म. बीड, आष्टी तालुका शाखेच्या नवीन स्थलांतरित अत्याधुनिक आणि आकर्षक वास्तू उद्घाटनाचा भव्य सोहळा दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता उत्साहात पार पडला. बँकेच्या कार्यक्षमतेला वेग, तंत्रज्ञानाला नवसंजीवनी आणि ग्राहकसेवेला नवीन आयाम देणाऱ्या या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचा मान मोठ्या संख्येने जमलेल्या नागरिकांना मिळाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना) यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस, डॉ. विलास सोनवणे, विधिज्ञ बाबुराव अनारसे, विधिज्ञ वाल्मीक तात्या निकाळजे, संजय मेहेर या मान्यवरांनी उपस्थित राहून उद्घाटन सोहळा तेजस्वी बनविला. कार्यक्रमात बँकेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक डॉ. अरुण निरंतर, बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, संचालक चंद्रकांत सानप, विश्वनाथ माणूसमारे, विवेक पालवणकर, विश्वंभर थिगळे यांनी



उपस्थिती लावून बँकेच्या प्रगतीचा संकल्प अधिक दृढ केला.यासोबत बँकेचे राजेश कुलकर्णी (मुख्य कार्यकारी अधिकारी), प्रल्हाद राजुरीकर (उपमुख्य कार्यकारी अधिकारी), महेश पारगावकर (व्यवस्थापक), आत्माराम जगताप (कर्ज अधिकारी), संतोष माळवदे (शाखाधिकारी) यांची उपस्थिती नव्या वास्तूच्या सेवाभावी ध्येयधोरणाची साक्ष देणारी ठरली.सोहळ्यास बद्रीनाथ जगताप (सभापती पंचायत समिती), सुधीर पठाडे (सरपंच पांढरी), डी. एस. देशमुख (इंजिनियर), भारतभाऊ मुरकुटे (माजी नगराध्यक्ष), नामदेवराव राऊत, शैलेश सहस्रबुद्धे (उपनगराध्यक्ष), सुनील शेठ मेहेर, गणेशशेठ लाहोटी, महेश शेठ सावंत, अविनाश कदम (अध्यक्ष, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ), अण्णासाहेब साबळे (जिल्हा उपाध्यक्ष, लोकशाही पत्रकार संघ), पत्रकार शरद रेडेकर, संतोष नागरगोजे, समीर शेख यांच्या उपस्थितीने सोहळयास सामाजिक आणि प्रसारमाध्यमांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

आष्टी तालुक्यातील सर्व सभासद, ग्राहक, प्रतिष्ठित व्यापारी आणि जेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बँकेबद्दलचा विश्वास, निष्ठा आणि सहकार्याचे भव्य दर्शन घडवले. उपस्थित मान्यवरांनी नव्या वास्तूचे कौतुक करून बँकेच्या प्रगतीस शुभेच्छा दिल्या. नव्या वास्तूमुळे आष्टीतील आर्थिक व्यवहारांना नवी गती, अधिक सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व हातभार मिळणार आहे. आधुनिक डिजिटल बँकिंगच्या सुविधांनी सजलेली ही वास्तू सभासदांसाठी आणि ग्राहकांसाठी एक नवी अनुभूती ठरणार आहे. शाखाधिकारी संतोष माळवदे यांनी मन:पूर्वक आभार प्रदर्शन करत सर्व मान्यवर, सभासद आणि नागरिकांचे आभार व्यक्त केले. शाखेतील कर्मचारी प्रशांत मुळे, दिलीप राऊत, आकाश पांडव यांसह संपूर्ण कर्मचारी वर्गाची उपस्थिती आणि कार्यतत्परता विशेष उल्लेखनीय ठरली.

# चिखलीचे बबनदादा शिंदे यांना महाराष्ट्र भुषण राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार प्रदान

आष्टी – (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील चिखलीचे प्रगतशील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती बबनदादा शिंदे यांना अलिकडेच महाराष्ट्र भुषण राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते हा पुरस्कार नुकताच देण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील वडुज येथे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते बबनदादा शिंदे यांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानीत करण्यात आले. चिखली या गावामध्ये सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक आदि कार्यक्रमांमध्ये बबनदादा शिंदे यांचा मोठा सहभाग असतो. या छोट्या गावाला हा मोठा सन्मान मिळाला आहे. चिखलीचे सामाजिक कार्यकर्ते, कार्यतत्पर आणि समाजसेवेचा वसा घेतलेले बबनराव शिंदे यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.




या गौरवामुळे केवळ चिखलीचीच नव्हे तर संपूर्ण आष्टी तालुक्याची मान उंचावली आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वत्र भय आणि अनिश्चिततेचे वातावरण होते तेव्हा बबनदादा शिंदे यांनी सेवा हीच श्रद्धा या भावनेतून ग्रामस्थांना किराणा किट, मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून मानवता जापली आहे. चिखली गावामध्ये येथे विविध जयंती, उत्सव, सामाजिक उपक्रम, हरिनाम सप्ताह आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेत महापंगत, अन्नदान केलेले आहे. विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली आहे करीत आहेत. बबनदादा शिंदे हे दरवर्षी आषाढीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या सर्व वारकऱ्याला नाष्टा व चहा मोफत देतात. यांच्या कार्यातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श करणारा संवेदनशील दृष्टीकोन दिसून येतो. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, अन्नदान, किराणा किट वाटप आणि गोरगरीबांसाठी आर्थिक मदत हे त्यांच्या सततच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. दिवाळी, पाडवा,जयंती प्रत्येक सणासुदीला ते जनतेसोबत असतात. सेवाभाव हा बबनदादा शिंदे यांचा संकल्प आहे. अनेक वर्षापासून ते आ. सुरेश धस यांचे समर्थक म्हणून ते राजकीय कार्य करतात. ते जनहिताला सदैव प्राधान्य देतात. त्यांच्या या निःस्वार्थ, विकासाभिमुख आणि मानवता, सेवाभावाचा गौरव म्हणून महाराष्ट्र भूषण हा मानाचा पुरस्कार बबनदादा शिंदे यांना मिळाला आहे.

या पुरस्काराबद्दल आ. सुरेश धस, रामचंद्र निंभोरे, इंडिया बँकेचे मॅनेजर राकेश साई, बन्सीबापू मोरे, रामकृष्ण वाळेकर, संभाजी कोकणे, अंगद शिंदे, नवनाथ चखाले, गणेश लाहोटी, लक्ष्मण रेडेकर, सोपान कोकणे, ज्ञानदेव रेडेकर, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, आकाश टकले, शरद रेडेकर, राजेंद्र लाड, अण्णासाहेब साबळे, आजी, माजी सरपंच, पोलीस, चिखलीचे ग्रामस्थ, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले. डीएसपी न्युज लाईव्ह चनलच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते बबनदादा शिंदे यांना हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.



## मालेगाव घटनेचा केज येथे निषेध,आरोपीला कठोर शासन करण्याची सुवर्णकार व के.वि.सं.स ची मागणी

केज/प्रतिनिधी

मालेगाव नजीक डोंगराळे येथील साडेतीन वर्षाची चिमुकली यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर अत्याचार करून तिची निर्दयपणे क्रूर हत्या करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशी द्या अशी मागणी करत येथील केज तालुका सुवर्णकार संघटना व केज विकास संघर्ष समितीच्या वतीने केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,अलीकडील काळात दहा वर्षाखालील चिमुकल्या मुलीवर अत्याचाराचे व हत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. गुन्हेगारांवर कसलाच वचक राहिलेला नाही. राज्य व केंद्र सरकारने जनतेच्या भावना व मागणी लक्षात घेऊन अशा विशिष्ठ संवेदनशील प्रकरणात विशेष कायदा करून आठ दिवसाच्या आत दिवसरात्र तपास व चौकशी करून दोषी असल्यास गुन्हेगाराला आठव्या दिवशी फाशी देण्यात यावी असे झाले तरच अशा प्रकारच्या घटना थांबतील व जनतेचा कायद्यावरील विश्वास कायम राहील. मात्र असे न होता अशा गुन्ह्याचा तपास व न्यायिक प्रक्रिया वर्षानुवर्षे चालत राहते. त्यामुळे अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहेत.आता लोकांचा संयम तुटू लागल्याने व कायद्या वरील विश्वास उडत चालल्याने लोक आता कायदा हातात घेऊन पोलिसांचे कडे तोडून न्यायालयात परिसरात घुसू लागले आहेत जे मालेगाव येथे घडले. आता शासनाने जनतेच्या संयमाची वाट न पाहता तात्काळ अशा प्रकरणा तील आरोपीला आठ दिवसात फाशीदेण्यासाठी कायदा व प्रक्रिया बदलावी अशी मागणी केज वासियांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केली आहे.यावेळी केज तालुका सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष गोविंद कणसे, माजी अध्यक्ष मोहनराव धपाटे,केज विकास संघर्ष समितीचे नासेर मुंडे यांच्या सह सराफा संघटनेचे पदाधिकारी प्रवीण भोसले,लखन वाकळे,मधुकर निंगुळे, सचिव प्रकाश कामाजी, सचिन वेदपाठक,संदीप नाईकनवरे,युवराज बुद्गुडे,राजेंद्र पंडित, विकास तरकसबंद,संजय रोडे,संतोष नेमटे, मफिजूल इस्लाम,दत्ता दीक्षित,शफिफुल शेख, मनोज कदम,संकेत धस यांच्यासह इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नसीम इनामदार आणि सबा कुरेशी यांना जनतेचा वाढता प्रतिसाद

## वार्ड १६ मध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट )ची पकड मजबूत

बीड (प्रतिनिधी)

बीड नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीत वार्ड क्रमांक १६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. तुतारी चिन्हावर नगरसेवकपदाचे अधिकृत उमेदवार प्रभाग १६ (ब)चे हाजी नसीम इनामदार व १६ (अ)च्या कुरेशी सबा नाज एजाज अहमद यांच्या सह नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. स्मिता वाघमारे यांना ही या वार्डात स्थानिक नागरिकांकडून वाढता आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नसीम इनामदार आणि सबा कुरेशी यांनी घराघरात जाऊन जनसंपर्काचा धडाका





लावला आहे. विविध समाजघटकांशी सातत्याने संपर्क साधत या दोन्ही उमेदवारांनी आपली ओळख विकासाभिमुख आणि लोकाभिमुख नेते म्हणून निर्माण केली आहे. नागरिकांशी घनिष्ठ संवाद आणि प्रभागातील प्रलंबित प्रश्नांबाबत दाखवलेली तत्परता यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे.राजकीय जाणकारांच्या मते, वार्ड १६ मध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट)चा प्रभाव अधिक दृढ होत असून, येत्या नगरविकास निवडणुकीत या गटाच्या सर्व उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचे संकेत मिळत आहेत.

# धारूरमध्ये नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवार, नगरसेवक पदासाठी ८५ उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी । धारूर

धारूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या अखेरच्या दिवशी अंतिम चित्र स्पष्ट झाले असून, नगराध्यक्ष पदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ८५ उमेदवार रिंगणात उभे राहिले आहेत. प्रारंभी नगराध्यक्षपदासाठी १४ जणांनी दाखल केलेल्या १६ अर्जांपैकी ४ अर्ज अवैध ठरले. त्यानंतर माघारीच्या दिवशी अनेकांनी माघार घेतल्याने अखेर ५ उमेदवार रिंगणात उरले असून त्यापैकी १ अपक्ष उमेदवार आहे.

नगराध्यक्ष पदासाठी आता प्रमुख पक्षांमध्ये सरळ लढत होत असून उमेदवारांचे समीकरण पुढीलप्रमाणे आहे ,

भाजप: रामचंद्र निर्मळ ,

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): बालासाहेब जाधव ,

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट): अर्जुन गायकवाड ,

शिवसेना (एकनाथ शिंदे गट): सुरेश गवळी ,

अपक्ष: कुंडलिक शिंदे .

नगरसेवक पदासाठी एकूण १५१ अर्ज दाखल झाले होते. त्यातील ३२ अर्ज अवैध ठरले. उर्वरित १०८ उमेदवारांपैकी २३ जणांनी माघार घेतल्यामुळे अंतिमतः ८५ उमेदवार वीस प्रभागांमधून निवडणुकीत उतरले आहेत. अपक्षांची संख्या पूर्वीच्या तुलनेत कमी होत ८ ते १० च्या आसपास स्थिरावली आहे.

अर्ज माघारीनंतर धारूरमधील निवडणूक वातावरण अधिकच तापले आहे. चार प्रमुख राजकीय पक्षांमध्ये झालेली सरळ चुरस लक्षवेधी ठरत आहे. भाजप उमेदवार रामचंद्र निर्मळ यांच्या प्रचारासाठी डॉ. स्वरूपसिंह हजारी आणि माधव निर्मळ हे कॉर्नर बैठकींवर भर देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार बालासाहेब जाधव यांच्या प्रचारासाठी आमदार प्रकाश सोळंके आणि जयसिंग सोळंके सक्रिय झाले असून त्यांनीही बैठकींची मालिका सुरू केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे उमेदवार अर्जुन गायकवाड यांच्या प्रचारात खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिष्ठान लावून मैदानात उतरत मतदारांशी संवाद सुरू केला आहे. तर शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार सुरेश गवळी यांनी बदल हवा - चेहरा नवा या ब्रीदवाक्याखाली घरदार संपर्क मोहीम राबवून गाठीभेटींना वेग दिला आहे.

धारूर नगरपरिषद निवडणुकीत पक्षीय लढत अधिक तीव्र होत असून भाजप, दोन राष्ट्रवादी गट यांच्यात तगडी चुरस निर्माण झाली आहे. स्थानिक राजकारणात विराजमान झालेल्या या चुरशीमुळे धारूरची निवडणूक रंगतदार बनली आहे

## प्रभाग क्रमांक ३ मध्ये शिवसेनेचा झंझावात रॅलीने शहराचे वातावरण झाले भगवे



अंबाजोगाई(प्रतिनिधी )

प्रभाग क्रमांक ३ मधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार सय्यद मोहम्मद सादिक व सौ पुजा गजानन मुडेगावकर यांच्या प्रचाराचा शुभारंभ पुत्रेश्वर मंदीर येथे तालुका प्रमुख अर्जुन वाघमारे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व जैन मंदीर येथे विमलनाथाचे दर्शन घेऊन करण्यात आला

यावेळी प्रभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला शिवसेनेच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याने नागरिकांनी निवडून देण्याचा निर्धार व्यक्त केला

अंबाजोगाई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून शिवसेना (शिंदे गट) नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन मुडेगांवकर व प्रभागातील उमेदवारांनी अंबाजोगाई शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. या रॅलीने संपुर्ण वातावरण ढवळून निघालेअसून शहरात भगवी लाट उसळली आहे. गुरूवार २० नोहेंबर रोजी अंबाजोगाई शहरातुन काढलेल्या महारॅलीने शहराचे संपूर्ण वातावरण भगवे झाले असून या रॅलीमध्ये शिवसैनिक नवयुवक , महिला, तसेच शिवसेना पदाधिकारी,उमेदवार यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. . . . यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार होते. शिवसेनेचे जेष्ठ नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे माध्यमातून अंबाजोगाई शहरात नवनवीन विकासाच्या संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन मुडेगांवकर त्यांच्या सर्व सहकारी उमेदवारांनी स्पष्ट केले. महिला,पुरुष,युवा मतदार उत्स्फूर्तपणे सहभागी रॅलीत झाले होते.



शिराढोण - नाशिक मालेगाव डोंगरगडे प्रकरणात न्यायासाठी शिराढोण पोलीस स्टेशन यांना निवेदन देण्यात आले.

# भारतीय लोक प्रशासन संस्थेतर्फे कै.बी.जी देशमुख वार्षिक निबंध स्पर्धेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे आयोजित कै. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सन २०२५-२०२६ या वर्षात निबंध स्पर्धेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचे युग, सोशल मीडिया आव्हाने आणि संधी, नागरिकांचे जीवन सुलभ करणे या तीन पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निबंध हा वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर इंग्रजी किंवा मराठीतून सादर करावयाचा आहे. निबंध ३ हजार शब्दांपेक्षा कमी आणि ५ हजार शब्दांपेक्षा जास्त नसावा, निबंध हा विषयाच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असणे अपेक्षित आहे. निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन त्यावर केवळ टोपणनांव लिहून चार प्रतीत सादर करावा.

स्पर्धकाने निबंधावर आपले नाव किंवा कोणत्याही प्रकारची ओळख नमूद करु नये, निबंधाच्या प्रती व त्या सोबत वेगळया लिफाफ्यात स्पर्धकाचे नाव (मराठी व इंग्रजीतून); टोपणनाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ता नमूद करुन निबंधासोबत पाठवावे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस ७ हजार ५०० रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये उत्तेजनार्थ बक्षिस २ हजार रुपये देण्यात येणार आहेत.संस्थेस प्राप्त झालेल्या निबंधाच्या प्रती परत करण्यात येणार नाहीत. निबंधाचे मूल्यमापन हे संस्थेच्या प्रादेशिक शाखेच्या परीक्षक मंडळाकडून करण्यात येईल. योग्य त्या गुणवत्तेचा निबंध नसल्यास स्पर्धकास बक्षीस न देण्याचा किंवा बक्षिसाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे. बक्षीस देण्याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम राहील. संस्थेच्यावतीने यापूर्वी घेतलेल्या स्पर्धेत विजेता ठरलेला किंवा उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त स्पर्धक हा लगतची तीन वर्षे या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाही.

टोपणनाव लिहिलेल्या निबंधाच्या चार प्रती व त्यासोबत वेगळ्या लिफाफ्यात स्पर्धकाचे संपूर्ण नाव (इंग्रजी व मराठी), टोपणनाव, पत्ता व संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ता लिहिलेली माहिती एकत्रित एका मोठ्या लिफाफ्यामध्ये बंद करुन त्यावर 'कै. श्री. बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा, २०२५-२०२६ असे नमूद करावे. आणि हा लिफाफा 'मानद अध्यक्ष, भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखा, तळ मजला, बँक ऑफ महाराष्ट्राच्या बाजूला मंत्रालय, मादम कामा मार्ग, मुंबई-४०००३२' या पत्त्यावर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत पाठवावा. स्पर्धकांच्या काही शंका असल्यास, माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक (०२२) २२७९ ३४३० किंवा ईमेल: ईमेल: क्षीीील-ळळरिशिर्सीं.ळप वर संपर्क साधावा, असे भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेचे मानद अध्यक्ष स्वाधीन क्षत्रिय यांनी कळविले आहे.

## शेतकऱ्यांची बिबट्यापासून सुरक्षेसाठी दिवसा वीजपुरवठ्याची मागणी

आ. सुरेश धस यांचे महावितरणला निवेदन

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी - पाटोदा - शिरूर (कासार) तालुक्यातील शेतकऱ्यांना सुरक्षिततेची भीषण परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बीड येथील कार्यकारी अभियंत्यांना औपचारिक निवेदन सादर करून दिवसा वीजपुरवठा देण्याची तातडीची मागणी केली आहे.



मागील काही दिवसांपासून या तीनही तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून नागरिकांसह शेतकरी भयभीत आहेत. विशेषतः रात्री आणि पहाटेच्या वेळी बिबट्याची हालचाल वाढत असल्याने रब्बी पिकांना पाणी देणे, कांद्याची लागवड तसेच ऊसतोडणीसारखी कामे मोठ्या अडचणीत आली आहेत. ऊसतोडणी मजूरदेखील रात्रीच्या वेळी काम करण्यास स्पष्ट नकार देत आहेत. सध्या महावितरणकडून शेतीपंपांना रात्री १२ ते पहाटे ६ या वेळेत वीजपुरवठा केला जातो. मात्र, या काळात बिबट्याचा धोका अत्यंत जास्त असल्याने शेतकरी शेतात जाणे टाळत आहेत. शेतीची सर्व कामे ठप्प झाले असून ही परिस्थिती लक्षात घेता शेतीपंपांसाठी दिवसभरात किमान ८ ते १० तास सातत्याने वीजपुरवठा देण्यात यावा, अशी आमदार धस यांनी निवेदनाद्वारे मागणी केली. दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाल्यास शेतकरी सुरक्षितपणे कार्यरत राहू शकतील तसेच ऊसतोडणी मजुरांना देखील भयमुक्त वातावरणात काम करणे शक्य होईल, असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या सुरक्षेला आणि हंगामी पिकांच्या तातडीच्या गरजेला प्राधान्य देऊन महावितरणने या मागणीची त्वरित दखल घ्यावी असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

बिबट्याचा मुक्त वावर...

आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी, घाटा - पिंपरी, धामणगाव रोडवरील घाटा पिंपरी जवळील घाट परिसरात वनविभागाच्या परिक्षेत्रात बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरून दर्शन करून परत येत असताना आष्टी सद्गुरु ग्रुपच्या युवकांना बिबट्या नगर - बीड महामार्ग ओलांडताना दिसला. या भागात वन्यप्राण्यांची वर्दळ वाढल्याने या महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांनी सतर्कता बाळगावी. विशेषता दुचाकी वरील प्रवाशांनी सावधगिरीने या मार्गावरून प्रवास करावा. परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# घामावंती नदीवर पूल नसल्याने विद्यार्थी,शेतकरी त्रस्त

## पूल करा नाहीतर नदीवरच उपोषण सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांचा इशारा

अंबड /प्रतिनिधी

चिंचखेड-जामखेड या मुख्य रस्त्यावर असलेली घामावंती नदी आज परिसरातील हजारो नागरिकांच्या हालअपेष्टांचे केंद्र बनली आहे.सतत वाहणारे पाणी नदीवर पूल नसणे आणि प्रशासनाचे सततचे दुर्लक्ष यामुळे विद्यार्थी, शेतकरी व सामान्य नागरिक रोज आपला जीव धोक्यात घालून प्रवास करतात.वारंवार निवेदने तक्रारी फोन सोशल मीडिया सगळं करूनही प्रशासन जागं झालेले नाही. अखेर संतापलेल्या नागरिकांनी कडक इशारा दिला आहे

घामावंती नदीवर पूल करा नाहीतर नदीवरच मुलाबाळांसह मोर्चा काढून उपोषण रोजचा जीवघेणा प्रवास विद्यार्थी दप्तरासह पडतात मोटारसायकलस्वार नदीत घसरतात

घामावंती नदीवर पूल नसल्यामुळे सकाळ-संध्याकाळ चिंचखेड,जामखेड,विठ्ठलवाडी, पागिरवाडी,पिंपरखेड व परिसरातील वाड्या-वस्त्यांतील नागरिकांना अत्यंत धोकादायक मार्गाने प्रवास करावा लागतो. या रस्त्यावरून जिल्हा परिषद हायस्कूल,मत्स्योदरी हायस्कूल, आदर्श कॉलेज या शाळा-महाविद्यालयांकडे दररोज १५०० पेक्षा अधिक विद्यार्थी ये-जा करतात. पावसात,पाण्यात,चिखलात विद्यार्थी दप्तर हातात घेऊन घसरतात,मोटारसायकली उलटतात,शेतकरी



नदीच्या प्रवाहात अडकतात. हा मुख्य रस्ता अंबडशी जोडणारा लाईफलाईन मार्ग असूनही प्रशासनाकडून प्रचंड दुर्लक्ष झाले आहे. वारंवार तक्रारी वारंवार निवेदने तरीही प्रशासन कानाडोळाच परिसरातील नागरिक व सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी मुख्य कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग जालना.उपविभागीय अधिकारी तहसीलदार,जिल्हाधिकारी वरिष्ठ अभियंते यांना फोन,निवेदनं,सोशल मीडियाद्वारे वारंवार कळवले. तरीही परिणाम शून्य. ना पाहणी ना निधी ना काम फक्त मौन आणि दुर्लक्ष.

सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांचा थेट आरोप व तीक्ष्ण सवाल पंकज मंडलिक म्हणाले मी सतत भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवतो.सगळे अधिकारी भ्रष्ट नाहीत पण जामखेड परिसरात जो काही भ्रष्टाचार झाला आहे ते पाहूनही अधिकारी शांत बसलेत. हिसक्यांची चिरी मेरी मिळाली म्हणून काय गोरगरिबांच्या कामाकडे पाठ फिरवायची ? ते पुढे म्हणाले जिल्हाधिकारी मॅडमनी फक्त १५-२० मिनिटे जामखेडमध्ये फिरा या विभागात भ्रष्टाचार कसा माजलाय ते स्वतःच्या डोळ्यांनी दिसेल त्यांच्या या वक्तव्याने परिसरातील नागरिकांच्या मनातील संताप अधिक भडकला आहे.पूल नसेल तर आंदोलनाची रणशिंगे फुंकली जातील सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी सांगितले सध्या संपूर्ण गाव व परिसरातील वाड्या-वस्ती, तांडे येथील नागरिकांची एकच मागणी

घामावंती नदीवर तातडीने पूल उभारण्यात यावा अन्यथा महिलांसह मुले-बाळे, विद्यार्थी,

शेतकरी हे सर्व मिळून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढतील आणि बेमुदत उपोषण सुरू करतील असा ठाम इशारा नागरिकांनी दिला आहे.

नागरिकांचा प्रशासकीय यंत्रणेला सवाल गोरगरिबांचा जीव स्वस्त आहे का ? की पूल बांधण्यासाठी अपघाताची वाट बघताय ? या रस्त्यावर रोज दुर्घटना घडत आहेत. तरीही ना पाहणी ना दुरुस्ती.नदीवरील तातडीच्या पुलाच्या कामासाठी शासनाने आणि बांधकाम विभागाने तातडीने कारवाई न केल्यास येथील परिस्थिती भयानक होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करतात.घामावंती नदीवरील पूल हा केवळ विकास नाही तो जीव वाचवण्याचा प्रश्न आहे.आता प्रशासन जागे होऊन निर्णय घेते का की नागरिकांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. ग्रामसेवक गाडगे मला पंधरा दिवसांपूर्वी ऑर्डर देऊनही अजून चार्ज दिला नाही त्यामुळे मी या संदर्भामध्ये काही करू शकत नाही तो चार्ज पंधरा दिवसापासून का दिला जात नाही हे वरिष्ठांना विचारावेत

# रेशनचा धान्य निकृष्ट दर्जाचे आढळल्या जाळी , कचरा,किड लागलेली ज्वारी

वडवणी प्रतिनिधी -

वडवणी तालुक्यात व वडवणी शहरातील स्वस्त धान्य दुकानात गत दोन महिन्यांपासून स्वस्त धान्य दुकानातून अतिशय निकृष्ट दर्जाच्या पिवळसर, काळसर, जाळी झालेले तांदळाचे, बुकटी झालेली ज्वारी चे वितरण करणे सुरू आहे. हा तांदूळ तीन ते चार वर्षे जुना असल्याचे सांगण्यात येत आहे. शासनाच्या आदेशानुसार नवीन तांदळाचे वितरण करणे आवश्यक असताना नियमबाह्यपणे तांदूळ वितरित करण्याचा धक्कादायक प्रकार सुरू आहे. जनावारेही तोंड लावणार नाहीत असा निकृष्ट तांदूळ , ज्वारी वितरित केला जात असल्याचे गावकरी सांगत आहेत.

महाराष्ट्र शासन व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनाअंतर्गत शासकीय स्वस्त धान्य दुकानातून दोन व तीन रुपये किलो, तसेच विनामूल्य तांदूळ राशन कार्डधारकांना वितरित करण्यात येतो. दोन महिन्यांपासून वडवणी शहरातील व वडवणी तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचा तांदूळ, ज्वारी देण्यात येत आहे. वडवणी येथे निकृष्ट दर्जाचा तांदूळ वितरित करण्याचा प्रकार सुरू असल्याने लाभार्थ्यात रोष निर्माण झाला आहे. या तांदळाला गुरेसुद्धा खात नाहीत, असे गावकरी सांगत आहेत.

मा.तहसिलदार साहेब व पुरवठा अधिकारी सांगतात की हा माल आपलेला गोंदिया जिल्ह्यात तून येतो.तेथून च माल असा येतो.

एवढ्या मोठ्या प्रमाणात निकृष्ट तांदूळ कुठून येतो हा संशोधनाचा विषय आहे. तांदूळ तपासण्याची जबाबदारी पुरवठा अधिकारी व निरीक्षण अधिकाऱ्याची आहे. याकरिता शासनाने राजपत्रित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. गोदामात तांदूळ आल्यानंतर ती पाहण्याची जबाबदारी निरीक्षण अधिकाऱ्याची असते. निरीक्षण केल्यानंतरच तांदूळ राशन दुकानात जातो. त्यामुळे निरीक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



नवीन तांदळाचा पुरवठा करण्याचा आदेश

राज्य शासनाने स्वस्त धान्य दुकानात विक्री करणाऱ्या येणारा तांदूळ हा नवीनच तांदूळ असावा असा आदेश काढला आहे; परंतु येथे नवीन तांदळासोबतच जुन्या तांदळाचा पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तांदूळ पुरवठा व वितरणात गौडबंगाल असल्याचे दिसून येते. स्वस्त धान्य दुकानात पुरवठा करण्यात आलेला तांदूळ जर निकृष्ट असेल तर स्वस्त धान्य दुकानदारांनी पुरवठा अधिकाऱ्यांना माहिती द्यावी, असे सांगण्यात येते. मात्र, स्वस्त धान्य दुकानदार अशा प्रकारची माहिती सांगत नाहीत. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या चार जिल्ह्यांत हे चार जिल्हे धान उत्पादक जिल्हे म्हणून प्रसिद्ध आहेत. या जिल्ह्यातील तांदूळ स्थानिक गावखेड्यात, तसेच संपूर्ण महाराष्ट्रात वितरित करण्यात येतो. त्यामुळे या तांदळाचे निरीक्षण व चौकशी करण्याची गरज आहे.

शासकीय आधारभूत खरेदी केंद्रावरील धानाची उचल करून ती मिलर्स यांना देण्यात येते. मिलर्सकडून तांदूळ शासकीय गोदामात जातो. त्यानंतर स्वस्त धान्य दुकानातून हे तांदूळ वितरित करण्यात येते. शासकीय धान खरेदी केंद्रातील धान हे चालू हंगामातील असतात; परंतु स्वस्त धान्य दुकानात वितरित करणारे तांदूळ मात्र हे तीन ते चार वर्षे जुने आहेत. त्यामुळे ते कोठून आणले जातात याची चौकशी केली तर मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. निकृष्ट तांदूळ बदलून देण्याची भाषा अधिकारी करतात; परंतु याची योग्य ती चौकशी करून दोषींवर कारवाई कोण करणार असा प्रश्न उपस्थित आहे.

दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी तहसीलदार साहेब यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली.यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकरराव झाडे, तालुका संघटक गणेशराव म्हेत्रे सर, सहसचिव नारायण जाधव उपस्थित होते.



## राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेतील खेळाडूंचे नेत्रदीपक यश

केज/प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेतील खेळाडूंनी दि.१३ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान शिर्डी या ठिकाणी पार पडलेल्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेमध्ये तांदळे अक्षदा अमर हिने राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळवला.तिला ब्रॉन्झ मेडल व प्रशस्तीपत्र मिळाले.तसेच हावळे मैथिली कैलास हिने राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेतील सहभागी प्रमाणपत्र मिळाले.

वरील यशस्वी खेळाडूंचा तसेच तायक्कांदो स्पर्धेचे प्रशिक्षक तथा मार्गदर्शक बन्सी राऊत यांचा जीवन विकास शिक्षण मंडळ केज संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,शाळेतील क्रीडाशिक्षक श्रीकिशन नेहरकर या सर्वांच्या उपस्थितीत पालकांसह सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.


# धनगर पिंपरीतील मोसंबी बागायतदाराची आक्रोशजनक कहाणी

## कष्टांच्या मोबदल्यात फक्त '१० रुपये संतप्त शेतकऱ्याने मोसंबीची झाडे तोडली

फारुक शेख :- अंबड तालुक्यातील धनगर पिंपरी येथील एका शेतकऱ्याने मोसंबी विक्रीतून शिल्लक मिळालेली केवळ १० रुपये होय चक्क १० रुपये! हा आकडा ऐकून गावकुस हादरला आहे.कष्ट,खर्च आणि बाजारपेठेतील निर्दयी अनास्था यांनी संतापलेल्या या शेतकऱ्याने अखेर विवश होऊन आपल्या मोसंबी बागेची सर्व झाडे तोडून टाकली. हा निर्णय केवळ त्या शेतकऱ्याची नव्हे, तर संपूर्ण शेतकरी समाजाची असहायता आणि आक्रोश अधोरेखित करणारा आहे.कष्टांचे मोल शून्यअडत-हमालीचा गदा दहा पटीने धनगर पिंपरीतील शेतकरी शंकर नरोडे यांची गट नंबर १७५ मधील शेतकरी यांनी आपल्या बागेतून ६६० किलो मोसंबी तोडून जालना मार्केटला नेली.मात्र तिथे त्यांना मिळालेली रक्कम आणि झालेला खर्च पाहून ते अक्षरशः कोसळले.खर्चाची आकडेवारी :

मजुरी ४ मजूर ह्व रु ४००- रु.१,६००,जालना वाहतूक भाडे रु.५५०,पेट्रोल खर्च रु.१०० एकूण खर्च अंदाजे रु.२,२५०, आणि उत्पन्न किती ?






६६० किलो मोसंबी विक्री रक्कम रु.१००,अडत,हमाली,कटिंग- रु.९० शेतकऱ्याच्या हातात उरले फक्त रु.१०,इतका मोठा खर्च, दिवसरात्र कष्ट आणि हातात फक्त दहा रुपये ? माझे तर डोळे पाणावले असा हताश क्षण ते सांगताना थरथरत होते. बाजारपेठेतील शोषणाचा भयावह नमुना शेतकऱ्यांचा माल चांगला असो वा सरासरी दर मात्र व्यापारी व अडते यांच्या मनमानीवर खर्च त्याच-नफा नाही हमाली-कटिंगचे अवास्तव वजावट यामुळे शेतकरी अक्षरशः तोट्यात जात आहेत.या प्रकरणाने संपूर्ण परिसरातील मोसंबी उत्पादकांचा रोष उफाळून आला आहे.

अखेरीस विवश निर्णय मोसंबीची झाडे तोडून टाकली बाजारातील अन्यायकारक दर व सततची तोट्याची भीषण परिस्थिती यामुळे या शेतकऱ्याने घरात परतताच पूर्ण बाग तोडून टाकली. व हे दृश्य पाहून ग्रामस्थही हळहळले.उत्पन्न नाही, तोटा मात्र वाढतोय मग या झाडांचा उपयोग काय ? असा प्रश्न त्यांनी वेदनांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या आयुष्याची शोकांतिकाज्ञकष्ट करूनही मिळणारा अपमानास्पद दर खर्चाचा ताळमेळ न बसणे आणि शासनाकडून दर संरक्षणाचा अभाव या सर्वांचा परिणाम म्हणजे बागा तोडण्याची वेळ येणे ही ग्रामीण शेतीव्यवस्थेची मोठी शोकांतिका ठरते.

शासनाने तातडीने हस्तक्षेपाची मागणी या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संताप उसळला आहे.मोसंबीला किमान आधारभूत दर जाहीर करा अडत-हमालीवरील अवाजवी वसुली तात्काळ रोखा फळउत्पादकांसाठी विशेष संरक्षण योजना द्या अशा मागण्यांनी प्रशासनावर दबाव वाढत आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू हा केवळ वैयक्तिक नाही तो संपूर्ण कृषीव्यवस्थेला विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँक व वि.वि सोसायटी यांच्या वतीने वित्तीय साक्षरता कार्यशाळा.....!



पैठण /प्रतिनिधी

दावरवाडी येथील औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने व दावरवाडी विविध विकास सहकारी सोसायटी दावरवाडी यांच्या संयुक्त विद्यामानाने कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांच्या वित्तीय साक्षरता अंतर्गत कार्यशाळा भरविण्यात आली होती या कार्यशाळांमध्ये नाबार्ड आणि ग्रामीण विकास बँक यांच्या संयुक्त विद्यमानाने आर्थिक साक्षरता अभियान राबवले जाते त्यामध्ये ग्रामीण भागातील लोकांसाठी आर्थिक आणि डिजिटल साक्षरता शिबिरे आयोजित वेळोवेळी आयोजित केली जातात ही शिबिरे वित्तीय साक्षरता केंद्रे एफ एल सी एस आणि ग्रामीण बँक च्या मदतीने चालतात त्यांचा उद्देश ग्रामीण जनतेला आर्थिक निर्णय घेण्यासाठी सक्षम बनवणे आणि वित्तीय सेवांचा लाभ घेण्यासाठी जागृत करणे हा आहे कार्यशाळा चे उद्दिष्ट ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक सेवा डिजिटल साक्षरता आणि ते नियोजनाची माहिती वेळोवेळी जेणेकरून ते आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील नाबार्ड आणि भारतीय रिझर्व बँक आरबीआय मिळवून हे अभियान राबवत असतात आज कार्यशाळेत एटीएम कार्ड धारकांना एटीएम विषयी माहिती सांगण्यात आली जिल्हा मध्यवर्ती बँकच्या एटीएम कार्ड धारकांना अपघाती विमा सरक्षण मिळते आणि ते कार्डाच्या प्रकारानुसार बदलते हे विमा संरक्षण सामान्यतः कार्डधारकांच्या दुर्दैवी मृत्यू किंवा अपंग तत्त्वाचा परिस्थितीत आर्थिक मदत करते आणि बँकेतील अकाउंटदारांना कधीही एटीएमची आपल्या शाखा अधिकाऱ्याला मागणी केली पाहिजे बँकेत गर्दी न होता हे एटीएम कुठेही आपल्या अकाउंट चे मीनी स्टेटमेंट पाहता येईल तसेच यावेळी विविध सहकारी सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या सर्व कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा मध्यवर्तीचे लोन ऑफिसर शाम तांगडे सोसायटी चेअरमन राजेंद्र वाघमोडे शाखा अधिकारी एल .के. खरग शिवप्रसाद भाडुरे लीपीक गणेश पहीलवान कॅशियर पी.के.जमधडे अकाउंट ऑफिसर मनोहर लीपाने यावेळी सोसायटी सभासद व बँक ठेवीदार गावातील शेतकरी व नागरिक

# लोकविकास महाआघाडीची अंबाजोगाई शहरात जोरदार मुसंडी

## प्रत्येक प्रभागातून राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांना उदंड असा प्रतिसाद

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई नगर परिषद पंचवार्षिक निवडणूकीच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरात फिरत असलेल्या लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व त्यांचे १५ प्रभागातील ३१ शिलेदार यांना त्यांच्या प्रचारादरम्यान अंबाजोगाई शहरवासीयांकडून उदंड असा प्रतिसाद पहायला मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.यावरून लोकविकास महाआघाडीने अंबाजोगाई शहरात प्रचारात जोरदार मुसंडी मारल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

नगर परिषदेच्या निवडणूकिसाठी स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार याची युती होऊन लोकविकास महाआघाडी निर्माण करण्यात आली. त्यानंतर या महाआघाडीला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), समाजवादी पार्टी ऑफ इंडिया या समविचारी पक्षांचा बिनशर्त असा जाहीर पाठींबा व्यक्त करण्यात आला. या विविध पक्षांच्या पाठिंब्यामुळे लोकविकास महा आघाडीचे पारडे जड झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.




लोकविकास महाआघाडीचे उमेदवार राजकिशोर मोदी व त्यांचे सहकारी मोईन भाई व रौफ बिल्डर यांनी प्रभाग १२ मध्ये जोरदार अशी प्रचार रॅली आयोजित केली होती. या प्रचार रॅलीमध्ये सदर बाजार, पेन्शन पुरा, मियाभाई कॉलनी, मोची गल्ली, शिंपी गल्ली, भोई गल्ली, आदी परिसरात या प्रभागातील प्रत्येक मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधत होते. तेथील नागरिक देखील राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करत होते. यावरून अंबाजोगाई नगर परिषदेसाठी स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या लोकविकास महा आघाडीवर किती मोठया प्रमाणावर विश्वास दाखवत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत होते.

# क्रांतीनगर येथे टीपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी

केज/प्रतिनिधी

केज येथे २० नोव्हेंबर गुरुवार रोजी शेर ए मैसूर, शेर ए हिंदुस्तान म्हणून ज्यांची जगभर ख्याती आहे असे हजरत टिपू सुलतान यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.यावेळी क्रांती नगर भागातील प्रचंड मोठा जनसमुदाय उपस्थित होता.येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.विधवा महिलांना स्वेटर व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत,वैचारिक ठेवा जपत यावेळी आगळी वेगळी जयंती साजरी करण्यात आली.जयंतीचे अध्यक्ष इरफान पठाण यांनी व त्यांच्या संपूर्ण टीमने जयंती साजरी करण्या साठी अथक परिश्रम घेतले.यावेळी केजच्या नगराध्यक्षा डॉ.सीताताई बनसोड या उपस्थित होत्या.त्याचप्रमाणे क्रांती नगरचे नगरसेवक अजहर भाई इनामदार हे देखील यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. सीताताई बनसोड म्हणाल्या की,या जयंतीचे वेगळेपण म्हणजे डी.जे. मिरवणूक न काढता सामाजिक भान ठेवून गरजूंना मदत करून ही जयंती साजरी होत आहे. याबद्दल येथील नियोजन कमिटीचे विशेष कौतुक केल या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेले व्याख्याते प्राध्यापक डॉ. सिद्धार्थ शिनगारे हे होते. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी हजरत टिपू सुलतान यांच्या विषयी विस्तृत अशी माहिती सांगताना म्हणाले की, टिपू सुलतान यांची जयंती साजरी करणे ही सर्व धर्मीयांची जबाबदारी आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की,हजरत टिपू सुलतान हे या भारत भूमीचे भूमिपुत्र आहेत.ते बाहेरून आलेले नाहीत. मुस्लिम समाज सर्वधर्म समभाव पाळतात.मशिदी मध्ये सर्वांना प्रवेश दिला जातोय.त्यावेळेस दलित स्त्रियांना हीनतेची वागणूक दिली जायची, परंतु हैदरअली म्हणजेच हजरत टिपू सुलतान यांचे वडील यांनी कोणालाही अर्धनग्न राहण्याची बळजबरी करू नये असा नियम काढून स्त्रियांचा आदर केला.अछुत, अस्पृशतेला त्यांनी आपल्या राज्यामध्ये कधी थारा दिला नाही.शेतीमध्ये अनेक सुधार करण्याचे कार्य हजरत टिपू सुलतान यांच्या राज्यामध्ये झालेले पाहायला मिळते.भारता मध्ये युद्धामध्ये टेक्नॉलॉजीचा वापर उत्तम प्रकारे केला जाऊ शकतो,याचा प्रत्यय हजरत टिपू सुलतान यांनी करून दिलेला आहे.टिपू सुलतान यांच्याकडे दोन हजार पुस्तके होती. यावरून ते किती गाढे अभ्यासक होते हे लक्षात येईल.सदरील कार्यक्रमा साठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.हारुणभाई इनामदार (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट) हे देखील उपस्थित होते.आझाद क्रांती सेनेचे सेनानायक राजेश भाऊ घोडे हे देखील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. ज्येष्ठ मार्गदर्शक बाबुराव गालफाडे,आझाद क्रांती सेनेचे केज तालुकाध्यक्ष शरद थोरात,आझादक्रांती सेनेचे उपशहर प्रमुख अनिल लोखंडे,सामाजिक कार्यकर्ते लखन हजारे, शितलताई लांडगे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला तालुकाध्यक्ष),सामाजिक कार्यकर्ते रोहित कसबे, सामाजिक कार्यकर्ते योगेश गायकवाड,दलित महासंघाचे तालुकाध्यक्ष विनायकरावजी लोंढे, कयूम तांबोळी,अजिंक्य माने,अजय गालफाडे, प्रेम गायकवाड,त्याच प्रमाणे पत्रकार पांडुरंग कसबे,हजरत टिपू सुलतान जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष इरफान पठाणआझाद क्रांती सेना शहरप्रमुख,उपाध्यक्ष अमन पठाण,सचिव साहिल तांबोळी, कोषाध्यक्ष वाहेद तांबोळी व सुलतान कंपनीचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.




# चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी द्या

## मागणीसाठी गेवराईत मोर्चा सुवर्णकार समाजाकडून १००% बंद

गेवराई ( प्रतिनिधी ) मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावातील कु यज्ञा दुसाने या चार वर्षाच्या चिमुकलीवर अमानुषपणे अत्याचार करून अत्यंत निर्गुणपणे तिची हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ गेवराई सराफा असोसिएशन व सराफा सुवर्णकार फेडरेशन आणि समस्त सुवर्णकार बांधवांच्या वतीने गेवराई तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला. त्यासोबतच आरोपीला तात्काळ कठोर शासन करून फाशी द्यावी या मागणीसाठी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शेकडो गेवराईकर या मोर्चात सहभागी झाले होते.

मालेगाव येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली यात डोंगराळे गावातील यज्ञा दुसाने या चार वर्षाच्या चिमुकलीवर एका नराधमाने पाचवी अत्याचार करून अत्यंत अमानुषपणे तिच्या तोंडावर दगड घालून निर्दयीपणे हत्या केली. एका चिमुकली सोबत असे नीच कृत्य करणाऱ्या राक्षसी मनोवृत्तीच्या व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या नराधमाला तात्काळ कठोर शासन करून फाशी द्यावी किंवा त्याचा एन्काऊंटर करावा अशी मागणी गेवराई सराफ व सुवर्णकार संघटनेच्या वतीने करण्यात आली. या दुर्दैवी घटनेचा निषेध करून दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी गेवराई शहरातील लालबहादूर शास्त्री यांच्या पुतळयापासून



पोलीस स्टेशन आणि तहसील कार्यालयात मोर्चा काढण्यात आला. यावेळी गेवराई तालुका सराफा असोसिएशन सुवर्णकार फेडरेशन बीड जिल्हा यांच्या वतीने तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात, अत्याचाराच्या घटनेच्या तपासात कुठलीही त्रुटी न ठेवता योग्य पद्धतीने आणि शीघ्र गतीने तपासून आरोपपत्र त्वरित न्यायालयात दाखल व्हावे. तसेच हा खटला शीघ्रगती विशेष न्यायालयात चालवावा. मुख्य गुन्हेगार व त्यास सहकार्य करणाऱ्याला देखील सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करून कारवाई करावी. अत्याचार झालेल्या चिमुरडीच्या कुटुंबाला शासनातर्फे पोलीस संरक्षण आणि आर्थिक सहाय्य देण्यात यावे. त्यासोबतच कोणत्याही महिला वरील अत्याचार प्रकरणी प्रशासनाने अधिक गंभीरपणे दखल घेत कडक आणि धडक कारवाईचे धोरण अमलात आणावी म्हणजे गुन्हेगारांवर वचक बसेल अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी बाळराजे पवार, युधाजित पंडित, महेश दाभाडे, ऋषिकेश बेदरे, अमोल करांडे, दिनकर शिंदे, राजेंद्र मोटे, उद्धव मडके, अभिषेक दाभाडे, राजेश टाक, वैभव शहाणे, रामानंद तपासे, सोपान मडके, मनोज टाक, शिनुभाऊ बेदरे, शामराव उडणसिंह, राधेश्याम येवले, रवी दहिवाळ, डॉ अभिजीत येवले, अनिल आगुंडे,राजू मोटे, महेश सौंदरमल, प्रशांत राख, अतुल हाके, संतोष भोसले, शिवाजी दहिवाळ, सखाहरी अंबिलवादे, माऊली टाक, राधाकिसन मोटे यांच्यासह विविध समाजाचे शेकडो गेवराईकर बांधव सहभागी झाले होते.

# हॉटेल व व्यवसायिकांनी घरगुती गॅसचा गैरवापर थांबवा

## तहसीलदार सुमन मोरे व नायब तहसीलदार विकाससिंग राजपूत यांचा इशारा.

डॉ आशिष तिवारी/मंठा

तालुक्यातील काही हॉटेल तसेच व्यावसायिक प्रतिष्ठानांकडून घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करून स्वयंपाक व व्यावसायिक कामे केली जात असल्याचे प्रकार समोर येत असून, प्रशासनाने याबाबत गंभीर भूमिका घेतली आहे.तहसील कार्यालयाकडून काढलेल्या निवेदनात तहसीलदार सुमन मोरे यांनी स्पष्ट केले की, घरगुती गॅसचा वापर फक्त घरगुती कारणांसाठीच मान्य आहे. व्यावसायिक वापर करणे हा जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अन्वये गुन्हा ठरतो.नायब तहसीलदार विकाससिंग राजपूत यांनीही इशारा देत म्हटले की, घरगुती गॅसचा गैरवापर आढळल्यास संबंधितांविरुद्ध कलम ३ व ७ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

प्रशासनाचे निर्देश :

१)व्यवसायिकांनी वर्गनिहाय परवान्यानुसार व्यावसायिक गॅस सिलेंडरचाच वापर करावा

२)घरगुती गॅसचा वापर करताना आढळल्यास दंडात्मक व कठोर कारवाई

३)नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक

प्रशासनाने सर्व व्यावसायिकांना आवाहन केले आहे की, कायद्याचे उल्लंघन टाळावे व परवानाधारक गॅसचाच वापर करावा. अन्यथा कारवाई अपरिहार्य असेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# केज शहरातील नागरिक वत्सला खांडेकर यांचे दुखःद निधन

केज/प्रतिनिधी

केज शहरातील जेष्ठ महिला वत्सला इंदाकर राव खांडेकर वय ६० वर्ष यांचे गुरुवारी सायंकाळी अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर




शुक्रवार रोजी सकाळी सोनिजवळा रोड येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले मुली जावाई, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्या सेवानिवृत्त कर्मचारी इंदाकरराव खांडेकर यांच्या पत्नी होत व वैभव खांडेकर यांच्या आई होत.

# जिल्ह्यातील ऊस दर प्रश्न पेटणार

## सर्व शेतकरी संघटनांकडून बेमुदत चक्काजाम !

परळी / प्रतिनिधी

ऊसदर प्रश्नी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एक होत आक्रमक पवित्रा घेत आहेत. जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी दि २४ नोव्हेंबर रोजी ऊस दरासाठी होणाऱ्या अभूतपूर्व चक्काजाम आंदोलनात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे व ऊसतोडी बंद ठेवून ऊसतोड व वाहतूक बांधवांनी सहकार्य करण्याचे व सभाव्य नुकसान टाळण्याचे आवाहन ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे. दि २३ रोजी शेतकऱ्यांनी आपापल्या गावात टायर जाळून आपण सहभागी असल्याचा व यंत्रणांनी दखल घेण्याचा सुचक इशारा द्यावा.

दि १९ नोव्हेंबर रोजी माजलगाव येथील बाजार समितीत जिल्हाभरातील सर्व शेतकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांची व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक झाली या बैठकीत या आंदोलनातील विविध टप्प्यांचा आढावा मांडून ऊस कारखान्यांच्या असंवेदशील वागण्याचा आढावा मांडण्यात आला.

गळाप हंगाम २०२५ - २६ साठी बीड जिल्ह्यातील कोणत्याही कारखान्याने केंद्र शासनाच्या घोषित एफआरपीप्रमाणे ऊसदर किती देणार ? याबाबत कोणतेही भाष्य किंवा प्रसिद्धी पत्रक जाहीर केलेले नाही. यामुळे ऊसाचे दर आणि त्या दरांची घोषणा याबाबत जिल्हाभरात ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाला तो रस्त्यावर उतरला आहे. या अनुषंगाने ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी नी जिल्हाभरातील जवळपास सर्वच ऊस कारखान्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे एक रक्कमी भाव मिळावा. तसेच या गाळप हंगामासाठी किती दर देणार? हे विचारण्यासाठी शिष्टमंडळ भेटले. मात्र यातून अपेक्षित गोष्टी घडून आल्या नाहीत. म्हणून हा प्रश्न आणखी चिगळला आहे. या अनुषंगाने दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी माजलगाव येथील वसंतराव नाईक चौक परभणी नाका या ठिकाणी जोपर्यंत प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. ऊस कारखानदाराशी चर्चाकरून प्रश्न मार्गी लावण्याचा शेतकऱ्यांनी प्रयत्न केला होता; मात्र त्याला कारखानदारांनी प्रतिसाद न देऊन ती संधी गमावली. आता चर्चा चौकात होईल त्याच्यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात दीर्घकाळ संघर्ष करण्याच्या तयारीने यावे व सर्व ऊस कारखानदार व साखर सहसंचालक संभाजीनगर यांना चर्चेसाठी येथेच येणे भाग पडावे आता चर्चा टेबलावर नाही

# निमगाव प्रा.आरोग्य केंद्रास सहा महिन्यापासून रुग्णवाहिका मिळेना...!!

## प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया, शिष्टमंडळ घेणार माजी मुख्यमंत्री, आमदारांची भेट

अर्धापूर /प्रतिनिधी

तालुक्यातील निमगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे गेल्या सहा महिन्यापासून रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे येथे गरोदर महिलांसह विविध रुग्णांना मोठी हेळसांड होत असून इतर रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक वेळा गरोदर मातांसह रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे याकडे प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे अशा प्रतिक्रिया येथील ग्रामस्थांमधून निघत आहेत.

निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिक गेल्या पाच ते सहा महिन्यापासून दुरुस्त नसल्याने रुग्ण व नातेवाईकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील रुग्णालयाची गती मंदावली असून कोणी रूग्णवाहीका देता का रूग्णवाहीका अशी आर्त हाक देण्याची वेळ येथील रुग्णांवर आली आहे. गत सहा महिन्यापासून रुग्णवाहिकेची दुरुस्ती होत




असल्याची माहिती परिसरातील नागरिकांना मिळत आहे पण रुग्णवाहिका काही सेवेत उपलब्ध होईना.

तालुक्यात निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत परिसरातील निमगाव, चोरंबा, खैरगाव, रोडगी, चाभरा, चाभरा तांडा,सोनाळा, देशमुख वाडी, सायाळ वाडी आदी गावातील रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध होते. या परिसरात पाणी, शिक्षण, आरोग्य, रस्ते, धरणे असा चौफेर विकास केला आहे. तर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकामही पूर्णत्वास आले आहे. या परिसरात शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, आदिवासी बांधवांच्या आरोग्याची मोठी सोय झाली आहे. मात्र वरिष्ठ कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत सहा महिन्यापासून रुग्णवाहिका नसल्याने रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे. रुग्णवाहिका तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी रहिवाशांसह रुग्णांच्या नातेवाईकांनी केली आहे.

माजी मुख्यमंत्री तथा आमदारांची शिष्टमंडळ घेणार भेट... माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण यांची भेट घेऊन रुग्णवाहिका तात्काळ उपलब्ध करावी अशी मागणी परिसरातील शिष्टमंडळ करणार आहे.

रुग्णांची हेळसांड थांबवावी..!!!

रुग्णवाहिका अभावी गरोदर मातांसह अनेक रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. मागील आठवड्यात दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला असता व रुग्णवाहिकेची मोठी अडचण यावेळी निर्माण झाली होती. इतर रुग्णवाहिका येण्यासाठी वेळ लागत आहे. संबंधितांनी व्यवस्था करावी.

- देवराव कांबळे

सामाजिक कार्यकर्ते निमगाव

अनेकवेळा वेळेवर रूग्णवाहीका नसल्याने १०८ व अर्धापूर येथील रूग्णवाहीका मिळते

# हिमायतनगर नगरपंचायत निवडणूक रणसंग्रामात तणाव शिगेला

### ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड ी राष्ट्रवादी (अजितदादा गट) मोहम्मद जावेद यांच्यात उमेदवारी मागे घेण्यावरून गोंधळ

हिमायतनगर प्रतिनिधी

हिमायतनगर नगरपंचायत निवडणुकीला सुरुवात होताच राजकीय वातावरण तापले असून, आज दि २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रिये दरम्यान ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे नेते मोहम्मद जावेद यांच्यात जोरदार तणाव निर्माण झाला.

शहरातील १७ नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होत असताना, नामांकन परत घेण्याच्या दिवशी वार्ड क्रमांक ९ मध्ये मोठा गोंधळ झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. राष्ट्रवादीचे उमेदवार पांचमासे यांना अर्ज मागे घ्यायला लावला असा आरोप होत असल्याने परिस्थिती चिघळली. ठाकरे व राष्ट्रवादी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद, धक्काबुक्की व गदारोळ झाल्याचे चित्र तहसील कार्यालय परिसरात झाल्याचे पाहायला मिळाले.

ही संपूर्ण घटना सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, नागरिकांमध्येही या घटनेची चर्चा जोरात रंगली आहे. उमेदवारी मागे घेण्यावरून सुरू झालेला वाद आता राजकीय मतभेद टोकाला पोहोचल्याचे स्पष्ट दिसत आहे. निवडणुकीचा प्रचार अजून वेग घेण्याआधीच संघर्षाच्या ठिणग्या पडल्याने आगामी दिवसांत हिमायतनगरचे राजकारण आणखी तापणार आहे.

दरम्यान, आज काँग्रेसमधील नाराज नेते व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात दाखल केलेल्या अपक्ष उमेदवारी अर्जावर पक्षाने मनधरणी करून नियंत्रण मिळवले असून, अनेकांनी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे हिमायतनगरच्या निवडणुकीत आता चौरंगी लढतीची शक्यता बळावली आहे.

ही बातमी लिहीपर्यंत किती उमेदवारांनी अर्ज मागे घेतले याबाबत अंतिम आकडे उपलब्ध नसले तरी प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या नाराज उमेदवारांना अखाड्यातून बाहेर काढण्यात मोठे यश मिळवल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे त्यांच्या बाजूने समीकरणे अधिक मजबूत होण्यास मदत मिळणार आहे. एकूणच, हिमायतनगर नगरपंचायत निवडणूक थराराच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, सुरुवातीलाच उडालेला राजकीय ठिणगीसारखा संघर्ष निवडणुकीत रंगत आणणार हे निश्चित!

# दिलीप धर्माधिकारी यांना पक्ष न्याय देईल - प्रताप पाटील चिखलीकर

## बरबडा येथील सहविचार सभेत आश्वासन

नायगाव /प्रतिनिधी

नायगाव बरबडा येथे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बरबडा येथील स्वतंत्र सेनानी गोविदराव धर्माधिकारी सभागृहात दि . २० नोव्हेंबर रोजी सहविचार सभा संपन्न झालीं यावेळी

राज्याचे माजी मंत्री तथा मा.खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व कंधार लोहा विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली बरबडा येथे स्व सेनानी गोविदराव धर्माधिकारी सभागृहात सहविचार सभा संपन्न झालीं आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सहविचार



सभा संपन्न झाली.

यावेळी बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या गावातील प्रतिष्ठित नागरिक व मतदारांना बंधु भगिनी उपस्थित होते

सहविचार सभेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी जिल्हा अध्यक्ष नांदेड व प्रदेश सचिटणीस दिलीप धर्माधिकारी यांनी केले होते.

यावेळी वसंत सुगावे-,मुक्तेश्वर धोंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा सुनंदाताई जोगदंड, सौ.छायाताई दिलीप धर्माधिकारी, मनोहर भोसीकर, शिवाजी धर्माधिकारी, बालाजी शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक जिल्हाध्यक्ष, सुदर्शन धर्माधिकारी, प्रदेश संघटक डॉ. उत्तम सोनकांबळे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक नांदेड शहराध्यक्ष अँड.जमीर माली पटेल,बाबुराव कदम,आशिष धर्माधिकारी,महिला नांदेड शहराध्यक्ष सुरेखा पाटील, सरचिट सुजाता पाम्पटवार, प्रभाकर पवार गोळेगावकर, बाळासाहेब देशमुख कावळगावकर,शिवाजी पाटील जाधव,प्रा.जीवन चव्हाण, दत्ता पाटील होटाळकर, रावसाहेब बेलकर,सय्यद भाई मेकानिक,विश्वनाथराव बडूरे, पत्रकार बाळासाहेब पांडे, , संजय नेरलेवाड, विद्यार्थी आघाडीचे शिवचंद्र डांगे,अंकुश हनुमंते सामाजिक न्याय विभाग, मंगेश आईनवाड, ज्ञानेश्वर सुरेवाड, वानखेडे गुरुजी,नागोराव टिप्पलवार गुरुजी,यांच्यासह बरबडा जिल्हा परिषद गटातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ देखे जरा किस में किताना है दम कंधार नगरपालिका उमेदवारांचे चित्र स्पष्ट

## नगराध्यक्षपदाचा १ तर नगरसेवकपदाचे १९ अर्ज मागे

कंधार / प्रतिनिधी

अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी कंधार मध्ये नगराध्यक्षपदाचा १ तर नगरसेवक पदाचे १९ अर्ज मागे घेण्यात आले. आता नगराध्यक्षपदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ६१ उमेदवार रिंगणात आहेत. पालिकेची निवडणूक २ डिसेंबर रोजी होणार असून निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्याने पुढील १० ते १२ प्रचाराचा धुरळा पाहावयास मिळणार असून उमेदवार आ देखे जरा किसमें कितना है दम, या गीता प्रमाणे एकमेका विरुद्ध दंड थोपटणार आहे.

नगराध्यक्षपदासाठी मविआ वंचित बहुजन आघाडी कडून काँग्रेसचे शहाजी नळगे, महायुतीतील राष्ट्रवादीकडून हणमंत




(स्वप्निल) लुंगारे, भाजप कडून गंगाप्रसाद यन्नावार यांच्यात तिरंगी लढत होणार हे शुक्रवारी स्पष्ट झाले आहे. महायुतीतील शिवसेनेने अध्यक्षपदासाठी उमेदवार दिला नसला तरी नगरसेवकपदासाठी सेनेने उमेदवार दिले आहेत.' मविआ ' तील राष्ट्रवादी निवडणुकी पासून अलिप्त आहे. दरम्यान निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्याने पुढील दहा दिवस प्रचाराचा धुरळा उडणार आहे.

दरम्यान शुक्रवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने कोण कोण अर्ज मागे घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आपल्याला अवघड होणाऱ्या उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी गेली दोन दिवस विविध पक्षाच्या इच्छुकांकडून प्रयत्न झाले. त्यात काही प्रमाणात यश आले. शुक्रवारी नगरसेवक पदाच्या शिल्लक ८० आर्जा पैकी १९ अर्ज मागे घेण्यात आले. अध्यक्षपदासाठी १ अपक्ष उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने तीन उमेदवार रिंगणात राहिले आहेत.

नगरपरिषद निवडणूकीचा प्रचार हळूहळू वेग घेत आहे. विविध पक्षाचे उमेदवार आपल्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह डोर टू डोर जाऊन मतदारांना आपली भूमिका स्पष्ट करीत आहे. अपेक्षेप्रमाणे महायुतीतील भाजप व राष्ट्रवादी हे पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत असून ' मविआ ' वंचित बहुजन आघाडीला सोबत घेऊन मैदानात उतरली आहे.



नांदेड :- आज गोरठेकर संपर्क कार्यालय येथे ज्येष्ठ नेते अॅड. भाऊसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या उपस्थितीत उमरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर व संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे मराठवाडा सचिव किशोर कवडीकर, जिल्हा कार्याध्यक्ष संजय वाघमारे बोथीकर, जिल्हा प्रवक्ते प्रा.पि.एन.धसाडे सर,मा.लो.प.

जिल्हाध्यक्ष के.वाय.देवकांबळे, ग्रा.पं.सदस्य बोथी गोपाळराव खांडरे, ग्रा.पं.सदस्य बोथी पोचिराम दुबळेकर, युवा ता.उपाध्यक्ष उमरी प्रफुल्ल वाघमारे, तालुका सचिव उमरी राम बोईवार,माजी ग्रा.पं.सदस्य तळेगाव बाबुराव कवडीकर, गोविंद दत्ता कवडीकर, मारोती जकोजी कवडीकर ,अजय गोविंद कवडीकर, भाऊसाहेब भालेराव (दुर्गानगर), साहेबराव गायकवाड, परमेश्वर नागोराव कवडीकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी राजीव पाटील ढगे, आनंदराव यल्लमगोडे व जयविजय देशमुख,बालाजी देवके,बालाजी बट्टेवाड उपस्थित होते. पक्षात नव्याने येणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्वागत करून गोरठेकर परिवारांनी विकासाच्या वाटचालीत मजबूत पाऊल टाकल्याचे सांगितले.

# संलग्नित महाविद्यालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ प्रशासन कटिबद्ध - कुलगुरु डॉ. मनोहर चासकर

नांदेड :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कौशल्यविकास आणि शैक्षणिक उन्नती साधण्यासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक आणि आग्रहाची भूमिका घेत आहे. विद्यापीठाशी संबंधित विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी दूर करून महाविद्यालये आणि विद्यापीठ या दोघांचाही सर्वांगीण विकास साधण्यास विद्यापीठ प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

विद्यापीठातर्फे संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक व प्राचार्य यांच्यासमवेत सहविचार सभांचे आयोजन दि.१९ व २० नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या आधीसभा सभागृहात करण्यात आले होते. अध्यक्षीय स्थानावरून संबोधित करताना डॉ. चासकर यांनी विद्यापीठाच्या विकासदृष्टीची रूपरेषा मांडली.

या बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. माधव गव्हाणे, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार,



अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांसह विद्यापीठातील अनेक अधिकारी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले, संलग्नित महाविद्यालयांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्या अडचणींचे निराकरण आणि भविष्यातील शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ते पुढे म्हणाले, अॅकॅडेमीक अँड अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट (---) संदर्भात विद्यापीठाची आग्रही भूमिका असून सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे, ज्यामुळे शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तेत वाढ होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० टप्प्या टप्प्याने राबविण्यास सुरुवात झाली आहे आणि सर्वच महाविद्यालयांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. युआयएमएस सॉफ्टवेअरमुळे विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या कामकाजाला अधिक वेग प्राप्त झाला आहे.

परीक्षा पद्धतीबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, उत्तरपुस्तिकांचे स्कॅनिंगद्वारे मूल्यमापन सुरू केल्याने प्राध्यापकांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचत असून निकाल वेळेत लावण्यास मदत होत आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून प्रकरणे जलदगतीने निकाली काढली जात आहेत.

स्टार्टअप संस्कृती बळकट करण्यासाठी विद्यापीठाच्या आग्रही भूमिकेचा पुनरुच्चार करताना त्यांनी प्रत्येक महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना प्रेरित करून नवोन्मेषी स्टार्टअप प्रकल्प तयार करण्याचे आवाहन केले.

दोन दिवस चाललेल्या सहविचार सभेला सुमारे ७० संस्थाचालक आणि १५० प्राचार्य यांनी उपस्थिती लावली. खेळीमेळीच्या वातावरणात विद्यापीठ व महाविद्यालयांच्या विकासासाठी विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.



# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये क्रीडा महोत्सवाची तयारी जोरात

नांदेड /प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा मध्ये येथे २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या बाबतची तयारी जोरात चालू आहे. दि. ४ ते ८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या भव्य क्रीडा महोत्सवात राज्यातील विविध विद्यापीठांचे खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या महोत्सवात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, ऍथलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि बुद्धिबळ या क्रीडा प्रकारांच्या मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील जवळपास ३७२६ खेळाडू सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर ५७६ संघ व्यवस्थापक व मार्गदर्शकही येणार आहेत. या स्पर्धा निर्विवाद पणे पार पाडण्यासाठी राज्यातून २७६ पंच येणार आहेत.

सर्व स्पर्धा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. पदाधिकारी, सदस्य व स्पर्धा मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.महोत्सवाची सर्व तयारी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम तसेच विविध अधिकारी व कर्मचारी क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यरत आहेत.या महोत्सवामुळे राज्यातील विद्यार्थी-खेळाडूंना क्रीडा कौशल्य प्रदर्शनाचे व्यासपीठ तर मिळणारच, तसेच विद्यापीठांमधील क्रीडा संस्कृती अधिक बळकट होणार आहे .

## किनवट नगर परिषद निवडणुकी करिता अंतिम उमेदवार निश्चित

किनवट /प्रतिनिधी

नगर परिषद निवडणुकीच्या नामांकन प्रक्रियेत आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ शारदा चौंडेकर, मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्यासह निवडणुकी करिता नियुक्त अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रक्रिया शांततेत संपन्न केली. यावेळी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक पोलिस बंदोबस्त लावण्यात आला ज्यामध्ये पोलिस उप निरीक्षक सागर झाडे यांच्या सह पोलिस अधिकारी व कर्मचारी तैनात होते. तरी थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकी करिता ८ उमेदवार उभे राहिले असून १ ते १० प्रभागातील अंतिम उमेदवार खालील प्रमाणे उभे आहेत यांना दिनांक २६ रोजी चिन्ह वाटप केले जाणार असून त्याच दिवशी अधिकृतरित्या प्रचाराची सुरूवात होणार आहे.